
# जेल फोड

इंदुमति केळकर

म.ग्रं.सं. वाचनालय, ठाणे
विषय : बा. वा.
दा. क्र. : २०७८



BVBK-0402078

[illegible] वा-वा

२०७८

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.

[illegible]

वा. क्र. २०७८ दिनांक [illegible]

विषय वा-वा. क्र. ..........

स्वातंत्र्य कथा माला : २

# जेल फरार

BVBK-0402078

इंदुमती केळकर

किमत : ८ रुपये

रचना समवाय प्रकाशन, पुणे

प्रकाशक :
गोपाळ मोकाशी
सचिव, रचना समवाय
द्वारा अक्षर भांडार
९६८ सदाशिव पेठ,
उबऱ्या गणपती चौक, लक्ष्मी रस्ता
पुणे ४११ ०३०.

●

प्रथमावृत्ति : नोव्हेंबर, १९८६

●

मुद्रक :
संजीव देशपांडे
अक्षरमुद्रा
१३६०, शुक्रवार पेठ,
पुण ४११ ००२.

●

© प्रकाशकाधीन

●

किंमत : ८ रुपये

●

स्वातंत्र्य कथा माला-२



म. ग्रं. सं. शाखा.
क्र. २०७८
विषय पा-वा. क्र.

# जयप्रकाश–लोहिया

'जयप्रकाशजी, आपण जो अंधारा कोपरा पळून जाण्यासाठी निवडलाय ना, तो तसा सुरक्षित आहे; पण त्यांत एक अडचण आहे. गस्त घालणारा शिपाई फेरी मारून ८ व्या मिनिटाला तिथं परत येतो. तेवढ्या अवधीत पळ काढता आला पाहिजे.'

१९४२ ची गोष्ट. बिहारमधील हजारीबाग तुरुंगात सहा क्रांतिकारक विचार करीत होते त्या सहा जणांतील एकाने सुचवले. मग रोज गुपचुप चढायउतरायची तालीम सुरू झाली. भित होती १७ फूट म्हणजे जवळ जवळ तीन पुरुष उंच! ती दोराच्या सहाय्याने चढायची. योगेंद्र शुक्ल या कामात तरबेज ते गुरु बनले व एरबी गुरुवत् असणाऱ्या आपल्या पाच शिष्यांना ती कला शिकवू लागले.

तुरुंगात शिकवणे तरी बिनधास्त होते काय? जे करायचे ते अगदी चोरून! लपून–छपून! पहारेकऱ्यांच्या नकळत! जरा

उघडकीस आले तर केवळ योजना बारगळल्याचेच दुःख नव्हते. बंधने कडक झाली असती. पण अखेरीला सारेजण ती कला शिकले. बाकी त्यांना न जमायला काय झाले ? शिकायची इतकी तळमळ आणि शिष्य एकसे एक. ऐकायचीत नावे !

'पहिला शिष्य होता जयप्रकाश नारायण ! भारतीय स्वातंत्र्य संग्रामाचे अग्रगण्य नेते. दुसरे रामानन्दन मिश्र. दरभंगा येथे काँग्रेस समाजवादी पक्षाचे कार्य करणारे. तिसरे सूरजनारायण सिंग, चौथे गुलाबचंद गुप्त व पाचवे हजारी बाग जिल्हा काँग्रेस कमिटीचे चिटणीस शालिग्राम सिंह. सर्वच क्रांतिकारक. सर्वांचाच आत्मा तुरुंगाच्या त्या चार भिंतीत तडफडत होता. बाहेर एवढा क्रांतिसंग्राम चाललाय आणि आपणांसारख्या योद्ध्यांनी नपुंसक बनून इथे हातावर हात चोळत बसायचे ! छे ! काही तरी करायलाच हवे !

जयप्रकाश नारायण यांना युद्धविरोधी भाषणामुळे १९४० मध्येच पकडले होते व तेव्हापासून ते आतल्या आत जळत तुरुंगात दिवस काढत होते. छोडो भारत लढ्याचे रणशिंग ऐकल्यापासून तर मनाची तलखली खूपच वाढली.

त्यांचे उजवे हात रामानंदन मिश्र यांना देखील आंदोलन सुरू झाल्यानंतर २३ सप्टेंबरला पकडले होते. मुंबईला 'छोडो भारत' ठराव झाला तेव्हा ते मुंबईतच होते मग मद्रास, आंध्र व ओरिसात क्रांतीचा संदेश पोचवून ते कलकत्त्याला परतणार तेवढ्यात कटकला त्यांना पकडले. 'राष्ट्राला आग लागलीय अन् स्वस्थ कसा बसतोस' शरीरातला कण अन् कण हेच विचारीत होता. पण कटकच्या तुरुंगातून पलायन करण्याच्या विचारात असतानाच त्यांची बदली बेहरामपूर तुरुंगात झाली. तिथे हालचाल चालू

असताना रुसेलकुंडाला रवानगी झाली. या सततच्या बदल्यांनी सारेच बेत फसत होते. पण तेथून बदली झाली ती हजारीबाग तुरुंगात !

तेथे जयप्रकाश भेटले. सूरज नारायण, रामकृष्ण बेनीपुरी असे बिहारचे अनेक नेते भेटले अन् त्यांना खूप आनंद झाला पण मनातील पलायनाची ओढ मात्र दुप्पट वाढली होती. जयप्रकाश तर संधीची वाटच पहात होते. मग काय एक-एक करता तड-फडणाऱ्यांचा गट जमला. योजना आकार घेऊ लागली.

बाहेरच्या वातावरणानेही मनातील प्रक्षोभ अधिकच वाढवला. ९ ऑगस्टचा वणवा फार झपाट्याने पसरला होता. त्या आगीने अनेक सामान्यांना चेतवले, कार्यप्रवृत्त केले. जनतेने स्वयंस्फूर्तीने बंडाचा झेंडा उंच धरला. सरकारी यंत्रणा खिळखिळी करणे, सरकारी सत्ताकेंद्र ताब्यात घेणे, दळणवळण बंद पाडणे वगैरे कामे मोठ्या शौर्याने देशभरच्या जनतेने चालवली. पण तो वणवा काही महिन्यांनी विझू लागला. सरकारी धरपकड, अत्याचार, गोळीबार या सर्व प्रकारांनी क्रांतिज्योत मंद होत चालली.

जयप्रकाशांचे सहकारी डॉ. लोहिया, अच्युत पटवर्धन, अरुणा असफअल्ली बाहेर भूमिगत राहून कार्य करीत होते. लढ्याला इंधन पुरवत होते. त्यांना जर जयप्रकाशांची जोड मिळाली तर तो अमृतसिद्धीचा योग होईल. याच विचारामुळे हजारीबाग तुरुंगातील क्रांतिकारकांना वाटले, अशा वेळी जयप्रकाश कसेही करून बाहेर पाहिजेत. बाहेरचा अग्नी ते आणखी प्रज्वलित करू शकतील मनाची उतावळी आता आवरेना. तसे तर तुरुंगातील सर्वच देशभक्तांना बाहेर पडून क्रांतीकार्यात उडी घ्यायची होती. पण मार्ग दिसत नव्हता.

जयप्रकाशांना पलायनाच्या कटात फार लोकांना सामील करून घ्यायचे नव्हते. कारण गुप्तता टिकणे कठिण झाले असते. काही पहारेकऱ्यांना विश्वासात घेणे देखील धोक्याचेच होते. बाहेरून मदत मिळवणे तर फारच कठिण होते. इत्यर्थ असा की जे काय करायचे ते स्वत:च्या पायावर उभे राहून आणि स्वत:च्या बुद्धि-कौशल्यानेच करावयास हवे होते.

आणि एकदा भिंत चढून पळून जायचे हा मार्ग पक्का केल्या-नंतर अधिक धीर धरवेना. तरी देखील पळ काढणाऱ्या सहांना मदतनीस म्हणून आणखी चौघांना निवडले. त्या चौघांनी पळताना तर या सहांना मदत करायचीच होती. पण ते पळाल्यानंतर आतले वातावरण टिकवून धरायचे त्याहीपेक्षा महत्त्वाचे काम करायचे होते. ते तुरुंगात नाहीत याची पुसटशीसुद्धा शंका कुणाला येता कामा नये अशी खबरदारी घेणे आवश्यक होते. म्हणजेच त्या रात्री सर्वांचे लक्ष खिळवून ठेवायला हवे होते.

दिवाळी जवळ आली होती. सर्व कैद्यांना नवी धोतरे मिळाली. सहांच्या मनात आले, दोरखंडाचा प्रश्न मिटला. तुरुंग असला तरी दिवाळीच्या भावना तिथेही उचंबळून येतात. उत्सवप्रियता वाढते. बराच काळ तुरुंगात काढावा लागणार असल्याने जन्मठेपेचे कैदी कळत नकळत त्या वातावरणात समरस होतात. जेल त्यांना आपले घर वाटू लागते. राजकीय कैदी देखील याला अपवाद नसतात. त्यांचे देखील पहारेकऱ्यांबरोबर व जेल अधिकाऱ्यांबरोबर अनौपचारिक संबंध प्रस्थापित होतात. त्यांनाही वाटते की देशाच्या स्वातंत्र्यासाठी त्याग करून आलेली ही मंडळी आहेत. भयापोटी मदत करता आली नाही तरी मनात आदर भावना असते.

दिवाळी सुरू झाली. जेलमध्ये पणत्या लुकलुकू लागल्या. ८ ता.

ची ती रात्र पूर्ण काळोखी होती. चांदण्या चमचमत होत्या. पहारेकरी तो कोपरा सोडून पुढे गेला. सहातल्या एकाने झटदिशी एक टेबल तिथे आणून ठेवले. सहा आणि चार यांनी साश्रु नयनांनी परस्परांचा निरोप घेतला. त्या चौघांतले तिघे पहारेकऱ्याशी गप्पा मारायला निघून गेले. एकाने जाणाऱ्या सहांच्या गरम कपड्यांचे व बूटांचे गाठोडे सांभाळले. त्या आधी सहाही जणांच्या पलंगावर उशा रचून पांघरूण घालून मच्छरदाणी सोडली होती.



सूरज नारायणसिंग यांनी नव्या कोऱ्या धोतरांना पीळ देऊन मजबूत बनवलेला दोर आपल्या कमरेला बांधला. आता रोज सराव केलेली मानवी शिडी बनवावयाची होती. सूरजनारायण एकाच्या खांद्यावर बसले. योगेंद्र शुक्ला टेबलावर उभे राह्यले आणि सूरजनारायण यांच्यासकट त्यांनी त्याला खांद्यावर घेतले.

झटापट करीत कसे तरी सूरजनारायण भिंतीवर तर एकदाचे चढले. साऱ्या क्रिया विजच्या चपळाईने चालल्या होत्या. आता पुढचं काम सोपे होते. मग दोराचे टोक पकडून एकेक जण वर चढला. जयप्रकाशांना त्यांच्या उंचीमुळे व रामानन्दनना त्यांच्या तुडतुडीत देहयष्टीमुळं चटकन् वर चढता आले.

सहाहीजणांना तुरुंगाबाहेर खाली जमिनीवर पाय ठेवल्यावर हायसे वाटले. आतल्या सहकाऱ्याने दोर बाहेर टाकला. ही सर्व क्रिया सहा मिनिटात आटोपली होती. आतला सहकारी गाठोडे बाहेर टाकण्याच्या बेतात होता, तेवढयांत पहारेकऱ्याची चाहूल आली. टेबल व गाठोडे घेऊन तो आत पळाला.

बाहेरच्या सहांनीही गाठोडयाची वाट न पाहता पळायला सुरुवात केली. एखादी योजना ठरवणे सोपे असते. पण ती अमलात आणण्यासाठी करावी लागणारी तपश्चर्या म्हणजे अग्निपरीक्षाच असते. योजना घडत असताना शुद्धबुद्ध हरपलेली असते. हृदयात धाकधुक होत असले, तरी एक प्रकारची नशा तनमनाला व्यापून उरते. ते सहा व चार अशा नशेतच गुंग होते.

पण योजना सफल झाल्यावर दहाही जणांना नाचावे, घोषणा द्याव्यात, ओरडावे असे वाटू लागले. पण सर्वांच्याच हातात संयमाचे धारदार शस्त्र तळपत होते. आतल्या चौघांवर तर कमालीचा ताण होता. मन अगदी अस्वस्थ होते. जयप्रकाशांसारखा मोहरा बाहेर पाठवला खरा पण त्यांचे काय झाले असेल ! ते सुखरूप पळाले असतील का ? पण हे सारे विचार मनात ठेऊन चौघे गाणी म्हणू लागले. पहारेकऱ्यांशी दिवाळीच्या गप्पा मारू लागले. कुणाच्या बहिणीची, तर कुणाच्या पोराबाळांची चौकशी करू लागले. गप्पांना काय तोटा ! नवी खरेदी काय केली ?

बहिणीला वा बायकोला काय भेट देणार वगैरे वगैरे !

रामकृष्ण बेनीपुरींनी आणखीच नाटक रंगवलं. त्यांनी आरतीचे ताट हातात घेतले व जेलभर ते फिरत राह्यले. गाण्यांचा व भजनांचा कल्लोळ बाहेरच्यांना ऐकू जाईल इतक्या मोठ्या मोठ्यांदा केला.

पळता पळता आतला आवाज बराच काळ सहांनी ऐकला. जीव खाऊन सारे पळत होते. काटेकुटे, दगड धोंडे कशाचीच तमा नव्हती. बारा पावले तशी सुकुमार होती. कधीच अनवाणी चालायची सवय नव्हती.

जेलवरचा तो मोठा दिवा एखाद्या राक्षसासारखा डोळे वटारून पाठलाग करत होता. आकाशातले तारे रस्ता दाखवत होते. शेते, नाले, दऱ्या, जंगल पायाखालून सरकत होते पण चित्त कुठे ठिकाणावर होते ! अखेरीला सहा तासानंतर सर्वजण जेल टॉवर-वरील दिव्याच्या प्रकाशाच्या टप्प्याबाहेर पडले.

इकडे जेलमधल्या चौघांच्या मनात बागबूग होत होते. हृदयाच्या गाभाऱ्यात जपलेले रहस्य आता गळवाप्रमाणे ठसठसू लागले. पण रात्र वाढली तशी आपोआपच त्यांची सुटका झाली. अजूनपर्यंत धोक्याचा भोंगा वाजला नव्हता. मशाली घेऊन धावाधाव सुरू झाली नव्हती. त्या समाधानात 'आलबेल'च्या घंटेने आणखी आश्वस्त केले. झोप कुणालाच येईना. १२–१ नंतर पहाटेचे सहाचे टोले ऐकल्यावर मग जरा डोळा लागला.

दुसरीकडे तुरुंगाबाहेर धावणाऱ्या सहांनी देखील सहाच्या टोल्यालाच बसकण मारली. पाऊलही पुढे टाकवेना. पाय खूपच बोलू लागल्याने तोंडातून शब्द फुटेना. दिवाळीच्या कडक थंडीने शरीरे कुडकुडू लागली. आतापर्यंत मनाने शरीरावर ताबा ठेवला

होता. मन थोडे निर्धास्त झाल्यावर शरीरे बंड करून उठली सारे शरीर गारठले होते. कशी ऊब आणणार! रामानंदननी आपले खिसे चाचपले आणि ओ हो! खिशांत सिगरेटचे पाकीट व काडयांची पेटी सापडली. त्या काडीचा त्यावेळी केवढा आधार वाटला. सिगरेटी ओढल्यावर खूपच टवटवी आली. मग सुचले, शेकोटी पेटवली तर! आगपेटी सापडल्याने जग जिंकल्याचा आनंद झालाच होता. या कल्पनेने तो द्विगुणित झाला झाडाच्या फांद्या आणून शेकोटी पेटवली व निमिषात त्या ऊबेत सहाही जण निद्रा-देवीच्या कुशीत शिरले.

इकडे जेलमध्ये सहा कैदी गायब झाले आहेत हे सकाळी ८ वाजेपर्यंत कुणाच्याच ध्यानात आले नाही. ८ वाजता तुरुंगाधिकारी खडबडून जागे झाले. कसली दिवाळी अन् कसले काय? पाचावर धारण बसली. जिल्ह्याचे अधिकारी तुरुंगात धावत आले काय झाले हे? केवढी नामुष्की? एक वेळ अट्टल दरोडेखोर पळते तरी काही बिघडले नसते! पण हे सहा क्रांतिकारक पळाले म्हणजे केवढा बट्टा! 'आमच्या डोक्यावरचा सूर्य कधी मावळत नाही' अशी शेखी मिरवणाऱ्या ब्रिटिश साम्राज्याचे गोरे अधिकारी गर्भगळित झाले.

प्रांतिक सरकारला खबर मिळाली. जेल यंत्रणा व सरकारी यंत्रणा हातात हात घालून काम करू लागल्या. प्रकाश झोत टाकून जंगल पिसून काढले. विमानांतूनही पाहाणी झाली पण बैल गेल्यानंतर हा झोपा करण्यात आला होता. पक्षी पिंजऱ्यांतून उडून गेले होते.

जंगलात या सहाही जणांना फार वेळ झोप लागणे शक्यच नव्हते. जाग आली तेव्हा चांगलेच फटफटले होते. मंदमंद पावले

टाकीत प्रकाश येत होता. खरे तर वाफेचा चहा यावेळी पुढे असायचा पण भारत मातेने आपली चहा करावी या आकांक्षेने पुन्हा पळायला सुरुवात झाली. आतापर्यंत पोलिसांच्या हातावर तुरी दिल्या अन् आता आराम करण्याच्या मोहापायी सापडलो तर! पण आता पळताना फारच कष्ट होत होते. पाय सुजले होते; रक्ताळले होते. काटचाकुटचांच्या ओरखडचांतून रक्त येत होते. पण पुढे पुढे तर जायलाच हवे होते.

'पदोपदी पसरूनि निखारे आपुल्याच हाती।
होउनिया बेहोष धावलो ध्येयपथावरती।
कधि न थांबलो विश्रांतीस्तव, पाहिले न मागे।
बांधु न शकले प्रीतीचे वा कीर्तीचे धागे।।

मनात विचार आला आधारासाठी हातात काठी असावी. झाडाच्या मोठाल्या फांद्या उपटून सहा काठचा पळता पळताच तयार झाल्या. आता ते भयाण व निर्मनुष्य जंगल तुडवताना काठचांचा आधार सुखाचा वाटला. एवढचांत चित्त्याची डरकाळी ऐकू आली. पण या सहा मानवी चित्त्यांपुढे त्या चित्त्यालाही मान लववावीशी वाटली असावी. कारण दुरूनच नमस्ते करून तो उलट दिशेने निघून गेला.

पळता पळता गती केव्हा सावकाश झाली ते कळलेच नाही. पावले फक्त झपझप पडत होती. तरी सभोवतालच्या निसर्ग सौंदर्याकडे लक्ष जात होते. काय किमया त्या सौंदर्याची! थकलेल्या शरीरात कोवळचा सूर्य किरणांनी ऊब आणली. अश्विनातले ते मऊसूत सोनेरी ऊन न्हाऊ घालत होते. हिरव्या रंगांनी आपले भांडार खुले केले होते. पोपटी, हिरवेगार, सोनसळी, पाचू रंगी, गर्द हिरवा एक ना दोन किती छटा होत्या त्या! पण निसर्गाच्या

त्या लोभस रूपाकडे न्याहाळताही येत नव्हते, पायाखाली बघणेच प्राप्त झाले होते.

होता होता दहा वाजले. उबदार वाटणाऱ्या त्या उन्हाचा आता चटका बसू लागला. पोटातही कावळे कोकलू लागले. घशाला कोरड पडली. पैसे तर तुरुंगातल्या गाठोड्यात राहिले होते. रामानंदन मिश्रांना आठवले त्यांनी आपल्या बाहीत १०० रु. ची नोट शिवून घेतली होती. पण या जंगलात ती नोट म्हणजे कागदाचा कपटा. अन्न नाही, पाणी नाही, विश्रांती नाही, चालण्याला अंत नाही. होती फक्त दृढनिश्चयाची शिदोरी अन् ध्येयवादाची भरारी !

तेवढ्यात योगेन्द्र शुक्लांना खिशात पावली सापडली. पावलीने देवच पावला की ! हर्षभरित होऊन जवळच्या गरम झऱ्यावर सर्वजण गेले. सर्वांनी हात पाय तोंड खसाखसा धुतले. खूपच हुशारी वाटू लागली. जवळच एक खेडे दिसले योगेन्द्रांनी तिथे जाऊन त्या पावलीचे चुरमुरे आणले. सर्वांनी त्या अमृततुल्य पक्वान्नावर ताव मारला. अन्नपाणी पोटात गेल्यावर मग पुन्हा पायाकडे लक्ष गेले. फारच दुर्दशा झाली होती. मग नवे धोतर फाडून त्याच्या पट्ट्या केल्या व त्या सर्वांनी बँडेजसारख्या पायाला बांधल्या. मग एकेक पात्र असे दिसू लागले की वेड्याच्या इस्पितळातून सुटलेले वेडेच !

सायंकाळी ५ वाजेपर्यंत चालत राहण्याचा सर्वांनी नेट धरला. दुष्काळात तेरावा महिना तसे जयप्रकाशांचे जुने सायटिकाचे दुखणे अकस्मात् उद्भवले. आता काय करणार ? समाजवादी मित्र व सहकारी दुबे यांचे गाव ६ मैलांवर होते. तेथे काही काळ आश्रय घेता आला असता ! पण तेथवर जायचे कसे ? सुदैवाने

एक बैलगाडी दिसली. दुबेजींच्या गावी पोचवायला तो गाडीवान तयारही झाला. पण ३ रु. मागू लागला. 'अरे बाबा, तिथंवर ने. मग ३ रु. च काय आणखीही देऊ' सर्वांनीं समजावले.

पण त्या छोटचा गाडीत सर्वजण कसे मावणार? दोघेच बसू शकत होते. जेपी व रामानंदन गाडीत बसले व बाकीचे गाडी-बरोबर निघाले. थोडे पुढे जाताच गाडीवानाच्या डोक्यात काय आले कोण जाणे! तो तात्काळ पैसे द्या म्हणू लागला. त्या क्षणी ३ रु. कुठले देणार? रामानंदन मिश्रांनी आपले घडचाळ तारण म्हणून देऊ केले. पण त्या गाडीवानाला कसला संशय आला कोण जाणे! त्याने दोघांना खाली उतरवले व सर्वांच्या विनवण्या-समजावण्याला भीक न घालता तो सरळ निघून गेला.

काही क्षणांपूर्वी उसळलेली आनंदाची भावना हुलकावणी देऊन निघून गेली व चिंतेचे सावट पुन्हा पसरले. एक शब्दही बोलण्या-इतकी ताकद उरली नव्हती. अंधारू लागले होते. शेकोटी पेटवून सर्वजण भोवती बसले. प्रत्येकाच्या मनात विचारचक्र चालू होते. जयप्रकाशांना आपल्या दुखण्याचा अस्सा राग आला! प्रत्येक जण आपापल्या बुद्धिकौशल्याकडे मागणी करत होता. 'काही तरी उपाय सुचव ना!' भुकेने आतडी तुटू लागली. जयप्रकाशांना सायटिकाच्या असह्य वेदना होऊ लागल्या. काकडत-कुडकुडत कशी तरी रात्र काढली एकदाची!

पहाट झाली. मग मात्र वाटू लागले काही तरी केले पाहिजे. नाहीतर पुन्हा गजाआड जावे लागणार! जयप्रकाशांचे दुखणे यत्किंचितही कमी झाले नव्हते. त्यांच्या यातना इतरांना घेताही येत नव्हत्या. अचानक टयूब पेटली. यातना घेता येत नसतील पण त्यांना तर घेता येईल ना? शालिग्राम व शुक्ल यांनी

जयप्रकाशांना आलटून पालटून पाठुंगळीस घेतले. काफिला पुढे निघाला. वाटेत खेडे आले की संशय येऊ नये म्हणून जेपींना थोडा वेळ खाली उतरावयाचे व पुन्हा पाठुंगळी घेऊन चालू लागायचे.

वाटेत सतत दुबेजींच्या खेड्याची चौकशी केली की सांगण्यात येई, 'हाकेच्या अंतरावर आहे.' कोणी सांगे 'जरा जावा अगदी जवळ आहे बघा!' पण दोन तास वाट तुडवली तरी ते खेडे मृगजळाप्रमाणे दूरच राह्यले. आता मात्र जयप्रकाशांच्या बरोबर रामानंदन मिश्रही थकले. नाल्यापाशी झाडाच्या सावलीत दोघेही बसले. बाकीचे चौघे १०० रु. ची नोट घेऊन दुबेच्या खेड्याच्या चौकशीला निघाले

एक तासाच्या पायपिटीनंतर एकदाचे ते गाव सापडले. तेथून अन्न, सुटे पैसे व ३ बुटाचे जोड घेऊन चौघे जेपी–रामानंदनपाशी परतले. मग पुन्हा झोपाळा आशेच्या दिशेने झुकला. एक बैलगाडी मिळाली. आता जंगलाच्या अगदी अंतर्भागात सर्वांनी प्रवेश केला होता. गया व हजारीबाग जिल्ह्याच्या सीमेजवळ गाडी पोचली तेव्हा मध्यरात्र झाली होती वाटेत एक पोलिस चौकी दिसली. अंतःकरणे भीतीने धडधडू लागली. पण गाडी सुरक्षितपणे पुढे निसटली.

गाडीने हजारीबाग जिल्ह्याची हद्द ओलांडली. आता हृदयातली धडधड वाढली पण ती हर्षाने! मग गाडी तिथेच सोडून दिली. आता खिशात थोडे पैसे होते. पायात बूट होते. अन्नही हाताशी होते. आणखी काय हवे असणार? खाणे पिणे आटोपले व झाडाखाली सर्वांनी धरणीवर अंग टाकले अशी गाढ निद्रा कधीच अनुभवायला मिळणार नाही असे त्यांना वाटले.

सकाळी ताजेतवाने होऊन मंडळींनी शोण नदी पार केली. मग वाटू लागले आता सहाजणांनी एकत्र राहणे धोक्याचे आहे. जेपी, रामानंदन व योगेंद्र यांना पकडून देणारास ५ हजार व गुलाबचंद व शालिग्राम यांना प्रत्येकी २ हजार अशी बक्षीसे जाहीर झाली होती. पुन्हा अश्रूपूर्ण नयनांनी सहाजण फुटले. सूरजनारायण सिंग, योगेंद्र शुक्ल व गुलाबचंद गुप्त असे तिघे गंगा नदी पार करून उत्तर बिहारमध्ये शिरले. तर जयप्रकाश, रामानंदन व शालिग्राम सिंह असे तिघे पॅसेंजर गाडीने मोगलसराईला गेले. तेथून गंगा पार करून बनारस विश्व विद्यालयात पोचल्यावर तिघांनी सुटकेचा निश्वास टाकला.

सहाही जण ज्या हेतूने बाहेर पडले होते ते भूमिगत कार्य आ वासून पुढे उभे होते. प्रत्येक जण वेगवेगळ्या भागात कार्यरत झाला.

— ० —

४२ च्या क्रांतीचे भूमिगत नेते जयप्रकाश, लोहिया, अच्युतराव व अरुणाबाई या चौघांचाही पाठलाग शिकारी कुत्र्याप्रमाणे गुप्त-हेरांनी व पोलिसांनी चालवला होता. पण तरीही त्यांना हुलकावणी देऊन चौघे परस्परांना व कार्यकर्त्यांना भेटत होते. योजना आखत होते. मानवहत्त्या सर्वांनाच टाळायची होती. पण ती टाळून राज्य यंत्र मोडकळीस आणण्यासाठी काय वाटेल ते करायच्या निर्णयाप्रत नेते आले होते

जयप्रकाशांनी सशस्त्र आझाद दस्ता संघटित करावयाची योजना आखली लोहिया मुंबई–कलकत्ता येथे कार्यरत होते. जयप्रकाश हजारीबाग तुरुंगातून निसटल्यानंतर त्यांच्या कार्यात ते सहभागी

झाले. हिंदुस्थानच्या हद्दीत पोलिसांचे जाळे फारच पसरले होते. म्हणून भारतीय हद्दीबाहेर काम करायचा निर्णय झाला.

१९४३ च्या एप्रिलमध्ये नेपाळच्या जंगलात भूमिगत कार्यकर्त्यांचे पहिले संमेलन भरले व तेथे आझाद हिंद दस्त्याची स्थापना झाली. आझाद दस्त्याच्या सैनिकांना गनिमी छापामार तंत्राचे शिक्षण द्यायचे ठरले. नेपाळ तराईतील जंगली भाग छापामार आझाद दस्त्यांना शिक्षण देण्याचे अखिल भारतीय केंद्र बनले. अनेक निष्ठावान क्रांतिकारी तरुण या केंद्रात दाखल झाले.

कोशी नदीच्या परिसरात बकरी टापू नावाची जागा एखाद्या बेटासारखी होती. तेथेच एक झोपडी बांधून जयप्रकाश राहू लागले. आझाद दस्थाचे केंद्रीय संचालन तेथूनच होई. झोपडीच्या समोर एक टेकडी होती. तिथे बिनतारी संचार केंद्र उभारले आणि संचार-प्रचाराची सर्व व्यवस्था लोहिया पाहू लागले. याच टेकडीवरून आझाद हिंदुस्थानची आकाशवाणी लोहियांच्या मुखाने बोलू लागली.

प्रत्येक जिल्ह्यात किमान १० आझाद दस्ते संघटित करावे अशी योजना होती. सूरजनारायण सिंग यांच्या नेतृत्वाखाली एक स्वतंत्र परिषद स्थापन करण्यात आली प्रांतांत कार्य करण्यासाठी तीन सैनिक प्रशिक्षण शिबीरे भरवण्याची योजना ठरली त्यात सैनिकांची भरती केली जावयाची होती. पहिले शिक्षण शिबीर नेपाळात सुरू झाले. ३५ विश्वासू कार्यकर्ते या शिबीरात हजर झाले. नव्या नव्या ठिकाणी आझाद दस्त्याच्या शाखा सुरू करणे व त्यांच्या प्रशिक्षणाची व्यवस्था करणे हे प्रमुख काम होते.

नेपाळ शिबीराचे मुख्य शिक्षक सरदार नित्यानंद सिंह होते. (पुढे ते सोनबरसा येथे पोलिसांच्या गोळीला बळी पडले) दोन

महिने व्यवस्थितपणे शिबीर चालले. तथापि या दरम्यान हिंदुस्थान सरकारला नेपाळमधील क्रांतिकारकांच्या या कार्याचा वास लागला होता. ब्रिटिश सरकारच्या इशाऱ्यावरून जयप्रकाश, लोहिया, श्यामनंदन बाबू, कार्तिक प्रसाद सिंह, वैद्यनाथ झा, श्यामसुंदर प्रसाद वगैरेंना १९ मे १९४३ या दिवशी नेपाळ सरकारने पकडले.

सर्व कैद्यांना नेपाळ सरकारचे पोलीस हनुमान नगरच्या कच्च्या तुरुंगाकडे नेत असताना वाटेत जयप्रकाशांना त्यांचा एक मित्र भेटला. त्याच्याशी ते बोलत असता एक मुलगा तेथे येऊन रडतच म्हणाला. 'तुमचा बचाव आम्हाला करता आला नाही.' जयप्रकाश त्याला म्हणाले, 'हे बघ बाळा रडू नको. रडून काय होणार ? तुझ्या भावना मी समजू शकतो आता एक काम कर. तू मुख्य केंद्रावर शक्य तितक्या जलदीने पोच. तिथे कमांडन्ट सूरज नारायण सिंग असतील. त्यांना सांग छापामार सैनिक घेऊन हनुमान नगर तुरुंगावर हल्ला करा व आम्हाला सोडवा. पळ बेटा! त्वरा कर.'

डोंगरामध्ये ७० मैलांवर गनिमी सैनिकांचे मुख्य ठाणे होते. १८५७ च्या क्रांतीत याच डोंगराळ भागाने क्रांतिकारकांना सांभाळले होते तेव्हाही इंग्रज सरकारने नेपाळच्या राजाला क्रांतिकारकांना मदत देण्यापासून रोखले होते. त्या किशोराच्या माथ्यावर जयप्रकाशांनी खूपच मोठे ओझे टाकले होते. त्या पोराने तो भार लीलया वाहूला. मिळेल त्या साधनांचा वापर करून तो पोरगा मुख्य केंद्रावर पोचला. आपल्या लाडक्या नेत्याचा निरोप सैनिकांना मिळताच एकच निर्णय दुमदुमला 'आमच्या नेत्यांना आम्ही सोडवूंच सोडवू.'

सूरज नारायण सिंग व सरदार नित्यानंद यांच्या नेतृत्वाखाली

३५ आझाद दस्ता-क्रांतिकारकांचा जत्था हनुमान नगर तुरुंगावर छापा घालण्यास लगेच निघाला. राजबंद्यांना पहारेकऱ्यांच्या खोलीत ठेवले होते. रात्रीच्या वेळी आझाद-दस्ता गनिमी पथकाचे लोक तेथे पोचले त्यांनी प्रथम पहारेकऱ्यांचे लक्ष वेधून घेण्यासाठी हवेत बार काढले आसपासच्या झोपड्यांना आग लावली. अपेक्षे-प्रमाणे पहारेकरी इकडे तिकडे धावायला लागले गनिमी पथकाने जास्तच गोळीबार सुरू केला. त्या आधी त्यांनी टेलिफोनच्या तारा तोडल्या होत्या त्यामुळे राजधानी काठमाण्डुशी संपर्क करणे शक्य नव्हते. या एकाएकी झालेल्या हल्ल्याने पहारेकरी गोंधळले. त्यातच दिवे देखील फ्यूज उडवून विझवण्यात आले. त्यांना काहीच कळेना काय झालेय ते! जयप्रकाशांची झोप सावध होती. क्रांतिकारकांना 'काळजी करू नका' असा निरोपही सांकेतिक शब्दांत या आधी मिळाला होता. जयप्रकाश समजले काय घडलेय ते! ते पटकन बाहेर पडले

लोहियांची झोप मात्र गाढ असे. खोलीत अंधार होता. गनिमी पथक खोलीत शिरले तेव्हा लोहियांना जाग आली. ते आपला चष्मा व सिगरेट केस शोधू लागले. त्यांच्या हालचालीची चाहूल आझाद दस्त्याच्या गनिमी सैनिकांना लागली. त्यांना वाटले पहारेकरी बंदूक शोधतोय. त्यांनी लोहियांच्या छातीवर बंदूकीची नळी टेकवली. लोहियांनी विचारले, 'कोण आहे?' लोहियांचा आवाज ओळखून सैनिकांनी चपळाईने त्यांना बाहेर काढले. चष्मा व सिगरेट त्यांना शोधू दिली नाही.

प्रसंग बाका होता! जयप्रकाश व लोहिया यांची ताटातूट झाली होती. ते एकमेकांबद्दल चिंता करीत होते दोघांनाही वाटत होते, दुसरा गोळीला बळी पडला आहे. तब्बल २४ तासांनी दोघांची

भेट झाली. वाटेत दर गावी या सर्वांचा वेष व गोंधळलेली वागणूक पाहून गावकऱ्यांच्या मनांत शंका निर्माण होई. प्रत्येक ठिकाणी आझाद दस्त्याचे सैनिक वेगवेगळ्या कहाण्या रचून सांगत होते. प्रश्न विचारणाऱ्यांचे कसे तरी समाधान करीत होते.

इकडे पहारेकऱ्यांना वाटले खजिना लुटला गेलाय. पण खरो-खरीच त्याहूनही महत्त्वाचा खजिना लुटला गेलाय हे त्यांच्या खूप उशीरा ध्यानात आले.

नेपाळी सैनिकांनी गनिमी सैनिकांच्या बंदुका हिसकण्याची झटापट केली पण त्यांच्याच हातातील बंदुका गनिमांनी हिसकावून घेतल्या.

पळालेल्या क्रांतिकारकांना पकडण्याचा पोलिस शर्थीने प्रयत्न करीत होते. पण कैदी रानोमाळ फिरत फिरत मंझारी घाटावरून भारतीय हद्दीत राधोपूरला व तेथून दरभंगा व भागलपूरला कधी पायी तर कधी बैलगाडीतून सुरक्षित पोचले होते.


□

वा. सं. मं. ठाणे, [illegible] शाखा.

[illegible]

अ. क्र. [illegible] ......

विषय क्र. ..........



# वसंतदादा

'मी बोलणारा माणूस नाही. कृतीवर माझी श्रद्धा आहे.' २०-२२ वर्षांच्या सळसळत्या तरुणाने आपल्या सत्कार प्रसंगी केलेल्या छोटयाश्या भाषणांत म्हटले.

गांधीजींच्या आदेशाप्रमाणे हजारो लोक वैयक्तिक सत्याग्रह करीत होते. २४ मार्च १९४१ ला या तरुणाने– वसंत पाटलाने– सत्याग्रह केला. वैयक्तिक सत्याग्रहात अशातशाची वर्णी लागत नसे. तावून सुलाखून सत्याग्रहीची निवड केली जाई. वसंतराव पाटील त्यावेळी एवढया लहान वयात तालुका कॉंग्रेस कमिटीचे चिटणीस होते.

नुकताच सरदार पटेलाचा सातारा जिल्ह्यात दौरा झाला होता. त्या दौऱ्याने जिल्ह्यात चैतन्य फुलले, तरुणांचे बाहू स्फुरण पावू लागले. त्यातच संताप वाढवणाऱ्या नव्यानव्या बातम्या कानी येत होत्या. रावसाहेब पटवर्धनांना १ वर्ष स. म. शिक्षा झाली होती.

रोज अशा वार्ता कानावर आदळत होत्या. अशा प्रक्षोभक वातावरणात साताररला युवक सत्याग्रहींचे शिबिर भरले. तेथे इंदोलीचे दिनकरराव निकम यांचे कृतीस उद्युक्त करणारे जहाल भाषण झाले. वसंतराव शिबिरांत हजर होतेच. सत्याग्रहासाठी त्यांची निवड झाली. त्याचा त्यांना अपार हर्ष झाला.

विसूरला सत्याग्रहासाठी मिरवणुकीने वसंतराव गेले. प्रचंड जमावासमोरील आपल्या लहानशा भाषणांत त्यांनी कृति ही अधिक बोलकी असते असे म्हटले. त्यांना कऱ्हाडच्या कोर्टात ६ महिने सक्त मजूरीची शिक्षा झाली.

८ ऑगस्ट ४२ च्या मुंबई येथील 'चले जाव' काँग्रेस अधिवेशनाला वसंतराव व अनेक कार्यकर्ते हजर राहले. परतले ते पेटलेल्या मनानेच ४ सप्टेंबरला पद्माळयाला वसंतरावाच्या घरी सर्व जमले व घरादारावर तुळशीपत्र ठेवून मंडळी निघाली. भूमिगत कारवायांना सुरवात झाली. इस्लामपूर, वडूज, पाटण अशा अनेक कचेऱ्यांवर मोर्चे निघाले. सर्वत्र गोळीबार झाले. टपाल लुटण्याचा कार्यक्रम यशस्वी झाला, रेल्वे पाडण्यातही यश आले. 'पेटा व पेटवा' हा नारा सर्वत्र धुमत होता.

मग धरपकड, छापे व अत्याचार सुरू झाले. भूमिगत नेते व पोलिस यांचा लपाछपीचा खेळ चालू होता. उदयोन्मुख तरुण क्रांतिकारी वसंतरावांच्या नावे कैक गुन्हे होते. १० हजाराचे बक्षीसही जाहीर झाले. २२ जून १९४३ या दिवशी वसंतराव व हिंदूराव सिनेमा पाहून आपल्या खोलीवर येऊन झोपले. पहाटे ३ वाजता छापा मारून त्यांना पकडले. वसंतरावाना पिस्तुले, बंदुका, टाइम बॉम्ब, इत्यादी ज्वालाग्राहीपदार्थांचा संचय करण्याचा कधीपासूनच शौक होता. खोलीवरचा तो आक्षेपार्ह माल जप्त झाला.

सांगलीत खटला सुरू होता. २४ जुलैला निकाल होता, तुरुंगातील पक्का कैदी बनण्यावर दंडा बेडीचे दागिने घालावे लागण्याची शक्यता होती. त्या आधीच काय ते करायला हवे होते, आणि वसंतरावानी जेलमधून पळायचा धाडशी निर्णय केला. त्यांचे पलायन ही एक वेगळी आणि लढ्याला संजीवनी देणारी घटना होती. जुलै महिना असल्याने कृष्णा नदीला प्रचंड पूर आला होता. काठावर गाळ साचला होता. तो शनवारचा दिवस होता. आठवड्याचा बाजार भरला होता.

'आज सिनेमाला जाऊ' सांकेतिक शब्दात निरोपाची देवघेव झाली. दुपारी बरोबर २॥ वाजता वसंतरावांनी शौचाला जायचे म्हटले. त्यांना बाहेर काढले. हिंदूरावही त्याच निमित्ताने बाहेर पडले. पुन्हा कोंडायच्या आधी म्हणाले, 'थाळी पाट घासून घेतो, मग कोंडा.'

हवालदाराने पहाऱ्यावरील शिपायाकडे किल्ल्या देऊन म्हटले, 'यांचा थाळीपाट घासून झाला की दोघांना कोंड व मला किल्ली आणून दे.' हवालदार व तीन पोलिस निघून गेले, आता फक्त एक पहारेकरी समोर उभा होता. ज्यांना 'भजी' पाठवून सांकेतिक निरोप दिला होता असे कैदी शौचाच्या निमित्ताने बाहेर आले. तत्क्षणी कारवाई सुरू झाली. वसंतरावांनी चपळतेने पहारेकऱ्याचे हात पकडले. हिंदूरावांनी त्याची बंदुक हिसकावून घेतली. त्याच्या खिशातील काडतूसेही काढून घेऊन बंदुकीत चढवली. बाकीची काडतूसे दादानी घेतली. हिंदूराव जेलगेटवर आले. जेऊन. खाऊन आडवेतिडवे पसरलेल्या पोलिसांवर बंदुक रोखली. तटावरील पहारेकऱ्याजवळची बंदुक पत्रावळे व जाधव यांनी ताब्यात घेतली.

दुसरीकडे आणखी अकरा राजबंद्यांनी जवळपासच्या पहारेकऱ्याची व घंटीजवळच्या पहारेकऱ्याची अशा दोन बंदुका हिसकावून घेतल्या व सर्वजण गेटकडे पळत आले. 'आमच्या दादांना का मारले ?' खोटेंच भांडण आरंभले. पोलीस गोंधळले, त्यांच्याकडच्या १८ बंदुका व १८० काडतूसांवर राजबंद्यांनी कब्जा केला. पायखान्यावरचा पोलिस बंदुक रोखून आला तशी त्याची बंदुक जितपाल खोतने हिसकावली. गुलाब हवालदार बंदुक घेऊन येताच गणपत कोळीने त्याच्या हातातील बंदुक हिसकावली व त्याच्यावर ती मारली. तिचे तीन तुकडे झाले.

१६ राजबंदी १८ बंदुका घेऊन तटावर धावले. वर चढून त्यांनी धडाधड खाली उड्या टाकल्या व सूबालचा केला. खाली खडक होता. हिंदुरावांची उडी काठावर पडल्याने त्याचे पाय मोडले. तरी कसेतरी ते पोहत काठाला लागले.

पोलिसांनी तटाखालीच त्यांना पकडले. बाकीचे त्यांचे सहकारी गावात त्या रस्त्याने पळत असतानाच पोलिसांनी व घोडेस्वारांनी त्यांचा पाठलाग सुरू केला. तेव्हां ताब्यात घेतलेल्या बंदूका त्यांनी पोलिसावर रोखल्या व गोळीबार करीतच ते नदीच्या रोखाने पळत सुटले. नुकताच पूर येऊन गेला होता नदीचा काठ चिखलाने भरलेला होता. जेलपासून जवळ जवळ एक मैल अंतरावर ते पोहोचले होते. पोलिसांच्या गोळ्या चुकवीत व त्यांच्यावर उलट गोळीबार करीत क्रांतिकारक नदीकाठच्या चिखलात घुसले. एव्हाना सांगलवाडीपर्यंत ते पोहोचले होते. कांही पोलीस मोटारगाड्यांतून त्यांच्या मागावर निघाले होते. ते पोलीस सांगलवाडीस पोहोचले व तेथे झटापटीला तोंड लागले. उभय पक्षी बंदुकांच्या फैरी झडत होत्या.

क्रांतिकारकाच्या अचूक नेमबाजीमुळे पोलीस मागे हटले. क्रांतिकारकांनी चिखलातून नदी काठाने पळत पळत कृष्णा व वारणा नदीचा संगम गाठला. चिखलामुळे पोलिसांच्या मोटारींचा मार्ग खुंटला तेव्हा मागे वळून दुसऱ्या मार्गाने ते संगमाच्या वारणा नदीच्या तीरावर आले व तेथे दबा धरून बसले. संगमावर अलीकडे या तीरावर वसंतराव दादा बंदूक सरसावून वीरासन घालून



बसले व सहकाऱ्यांना पोहून नदीपार होण्याची त्यांनी सूचना दिली. ते नदी पोहून पैल तीराला पोहोचेपर्यंत वसंतराव दादांनी पोलीसांवर सतत गोळीबार करून त्यांना संरक्षण दिले. सात क्रांतिकारक वारणेचा प्रवाह पोहून पैल तीराला पोहोचले.

दोघे जण पोहून पलीकडे जात असताना पलीकडच्या तीराला दबा धरून बसलेल्या. पोलीसांनी त्यांच्या रोखाने बंदुका झाडल्या.

त्या दोघांपैकी बाबूराव जाधव यांना पोहत असतानाच गोळी लागली व ते जागच्याजागी ठार झाले. त्यांच्या बरोबर पोहणारा दुसरा क्रांतिकारक जयराम मात्र पोहून पैल तीराला गेला. सतरा वर्षांचा तरूण अण्णा पत्रावळे पळण्याच्या व नदी पोहून जाण्याच्या श्रमाने थकून पलीकडच्या तीरावर पडला होता. थकव्याने त्याच्याने पाऊल उचलवत नव्हते. पोलिसांनी दुरूनच त्याला पाहिले. आता आपले दिवस भरले ते त्याने ओळखले. तरीही दोन्ही हात वर करून तो उभा राहिला व आपल्याजवळ हत्यार नाही असे त्याने ओरडून पोलिसांना सांगितले. तथापि त्याच्या सांगण्याकडे लक्ष न देता पोलिसानी बंदुक झाडून त्याला टिपले. नदीच्या काठावर तो गतप्राण होऊन पडला.

वसंतराव सावंत व जितपाल खोत वारणेचा प्रवाह पोहून पलीकडे गेले. मात्र काही जण पाण्याचा अफाट विस्तार व वेगवान प्रवाह पाहून वारणेच्या प्रवाहात मध्ये एक लहानसे बेट होते त्या बेटावर थांबले. वसंतराव दादा हातातल्या बंदूकीने पोलिसांच्या बरोबर झुंज देतच होते. नदीपार करणाऱ्या सहकाऱ्यांना शर्थीने संरक्षण देत होते. ती झुंज चालू असतांना कृष्णा नदीच्या दुसऱ्या तीरावरून जिल्हा पोलीसप्रमुख हरिपुर या कृष्णा-वारणेच्या संगमावर वसलेल्या गावी येऊन थडकला व नावेत बसून वसंतराव दादा पाटलांवर त्याने गोळ्या झाडण्यास सुरूवात केली. वसंतराव दादांच्या हातातली बंदूकही आग ओकीत होती. ही झुंज दोन तास चालू होती.

वसंतरावांचा गोळ्यांचा भडिमार चालू असतांना मध्येच बंदूकीचा घोडा अडकला. तो ओढून काढताना पोलिसांना झाडाआडून दादांचा खांदा दिसला. पोलिसांनी नेम धरून गोळी झाडली

खांद्यांतून ती आरपार निघून गेली व दुसरी मांडीला लागली. वसंतराव शुद्ध हरपून रक्ताच्या थारोळ्यांत कोसळले.


जखमी वसंतरावांना अटक करून औषधोपचारासाठी सांगली हॉस्पीटल मध्ये नेले.

नदीच्या प्रवाहांतल्या बेटावर थांबलेल्या सहा क्रांतिकारकांना देखील त्यानंतर पकडून आणले. तरीही चौघेजण पोलिसांच्या हातावर तुरी देऊन निसटले.

वसंतराव व हिंदूराव याच्यावरचा खटला वर्षभर चालला व दोघांनाही १३ वर्षं सक्त मजूरीची शिक्षा फर्मावण्यांत आली.

एका धाडसी आणि रोमहर्षक अशा वेगळ्या पलायनाच्या प्रकरणाची अखेर ही अशी झाली.

◇



२०७८

# उत्तम-लीला-शिवाजी

क्रांतिसूर्य उगवला कीं त्या किरणांचा स्पर्श अनेक सामान्य-जनांना होतो व त्यांची जीवने त्या क्रांतिकिरणांमुळे उजळून निघतात. त्यांच्यात सुप्त रूपाने लपून असलेले क्रांतिबीज एकदम भूमीच्या बाहेर येते. काहींची जीवने झाडाझुडपाच्या तर काहींची वेलीचा स्वरूपात, काहींची लहानशा झाडात तर काहींची डेरेदार वृक्षांच्या स्वरूपात वाढतात. काही तात्पुरती छाया देतात तर काहींची छाया आमरण मिळत राहते. अशी क्रांतिमय वनसंपत्ती आंदोलनाच्या काळात चांगलीच फोफावते.

अनेक स्त्री पुरुष व युवजन यांनी क्रांतिप्रवाहात उडी घेतल्याची कैक उदाहरणे देशाच्या इतिहासात सापडतात. तथापि संपूर्ण कुटुंबाने घरादाराला राख फासून त्याग केल्याची उदाहरणे मात्र मोजकीच आहेत.

अशा मोजक्या उदाहरणांपैकी एक कुटुंब महाराष्ट्रात उदित

पावले. धुळे जिह्यांतील त्या परिवाराचे नाव पाटील. कुटुंबातील पाची जण ४२ सालच्या क्रांतियज्ञांत आहुति द्यायला पुढे निघाले. कुटुंब प्रमुख डॉ. उत्तमराव पाटील, त्यांची वृद्ध माता वेणुबाई, मधला भाऊ दशरथ आणि धाकटा भाऊ शिवाजी व विशीच्या आसपासची उत्तमरावांची तरुण पत्नी लीला. सर्वांनी नुसता चळवळीत भाग घेतला असे म्हणणे म्हणजे त्यांच्या कामगिरीचे अवमूल्यन केल्यासारखे होईल. प्रत्येकाचा वाटा वेगवेगळा असला तरी तितक्याच मोलाचा आहे.

खरे तर वृद्ध मातेने भाग घेऊ नये असे मुलांचे म्हणणे. पण आई थोडेच ऐकणार? त्या अट्टाहासाने तुरुंगांत गेल्या. तेथेच खूप आजारी झाल्या. आणि त्या आजारपणातच त्यांची प्राणज्योत निमाली. मुलांची-सुनेची भेट कशी होणार? एक भूमिगत तर दुसरे तुरुंगात!

अमळनेर जळित खटल्यात दशरथ व शिवाजी दोघे अडकले. पुढे शिवाजी भूमिगत झाला. गावोगाव तो व त्याचे समवयस्क मित्र सभा घेत फिरत राह्यले. वॉरंट असताना शिवाजी फिरतच होता. डिसेंबरमध्ये पकडला गेला व त्याला ९ महिन्यांची शिक्षा झाली. धुळे तुरुंगात त्याला डाबण्यांत आले.

दगडाला चिठ्ठ्या बांधून बाहेरच्या व आतल्या मित्रांचा संवाद चाले. त्यातूनच पळून जायची कल्पना साकारली. दोन भिंतींच्या कोपऱ्यात एकावर एक उभे राह्यचे व शिवाजीने वर चढायचे अशी तालीम सुरू झाली. काही मित्रांना हा पोरकटपणा वाटला तरी कौतुक होते. म्हणून यांच्या तालमीच्या वेळी ते जेलच्या शिपाई-जमादाराला गुंतवून ठेवीत.

बराकीच्या पटांगणांतील चिंचेच्या झाडावरून दोंडाइच्याचे

शाळेतले मित्र गोविंद नांगरे व शहाद्याचे मोहन भाई यांना दगडाला बांधून चिठ्ठी पाठवली. त्यात पळण्याचा मुहूर्त कळवला.

२६ जानेवारी १९४३ रोजी सकाळची गिनती होऊन कैद्यांना शौचमुखमार्जनासाठी मोकळे सोडले होते. युवक सत्याग्रहींनी दोन टोळ्या बनवल्या. एकीने जमादार वार्डरला गप्पांत अडकवले. तर दुसऱ्या टोळीने भिंतीच्या कोपऱ्यात धाव घेतली. पोरेच असल्याने झटक्यात मनोरा बनला व शिवाजीराजे टणकन भिंतीवर उभे राह्यले. एकदा आत बाहेर नजर टाकली आणि १८/२० फूटांवरून धाडकन उडी टाकली. शिवाजी जरा आदळला पणलगेच सावरून उभा राह्यला व धूम ठोकली. बाहेर मित्र उभेच होते.

इकडे जेलमध्ये 'शिवाजी पळाला' 'शिवाजी पळाला' अशी हाकाटी सुरू झाली. घणघण घंटानाद झाला. पण पक्षी निसटून गेला होता. काही काळ धुळे शहरात राहून पुढे उत्तमरावांकडे हैद्राबाद संस्थानात पोचला.

उत्तमराव व लीलाबाई दंपतीचे परम भाग्य की त्यांना सानेगुरुजींचा निकटचा सहवास लाभला. इतकेच नव्हे तर गुरुजींचे अलोट प्रेमही त्यांना लाभले. साने गुरूजी ज्यांचे स्फूर्तिस्थान होते अशांनी अमळनेर पेटवले. पोस्ट ऑफीस जाळले. कोर्टाची देखील राख केली. मग मोर्चा कचेरीवर झेंडा लावावयास निघाला. अंधार पडला होता. पोलिसांनी बेफाम गोळीबार सुरू केला. गोऱ्या सोजिरांच्या मोटारी रस्त्यांतून कशाही गोळ्या झाडत हिंडू लागल्या. कचेरीवर झेंडा लावण्याचे स्वप्न तसेच विरले.

या सव कार्यक्रमात लीलाबाई आघाडीवर होत्या. उत्तमराव भूमिगत असल्याने दुरूनच सर्व पहात होते. त्यांनी लीलाबाईंची पाठ थोपटली व निरोप घेतला.

दुसऱ्या दिवशी दशरथ 'नहीं रखनी, नहीं रखनी, जालिम सरकार नहीं रखनी' गाणे जोरात म्हणत एका मिरवणुकीच्या अग्रभागी चालत होता. लीलाबाई व आणखी ५–६ मुली अशी मिरवणुक निघाली होती. पोलिसांची गाडी धावत आली. दशरथला पकडले. व मारहाण चालवली. लीलाबाई हातातले निशाण फडकावत पुढे जात राहिल्या. 'झंडा ऊँचा रहे हमारा,' 'ऑगस्ट क्रांति जिंदाबाद' बाईला कसे अडवायचे? पोलिस पळभर गोंधळले, पण अधिकाऱ्याने हुकूम सोडला. 'खिचो झण्डा, पकडो, लगाव दस्ते' मग पाठीवर बंदुकीच्या दस्त्यांनी मारून पोलिसांनी लीलाबाईंना मोटारीत बसवले.

दीर व भावजय दोघांनाही ६ महिन्यांची शिक्षा होऊन धुळे जेलमध्ये पाठवले. तेथेच मारामुळे लीलाबाईंचा गर्भपात झाला. असह्य यातनांनी त्या भ्रमिष्ट झाल्या. पुन्हा त्यांच्यावर अमळनेर जळिताचा दुसरा खटला भरण्यात आला व ६॥ वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा देण्यात आली. एवढी प्रदीर्घ कठोर शिक्षा लाभलेली ही महाराष्ट्रातील पहिलीच स्त्री असावी. त्या काळात कच्च्या कैदेतल्या जळगाव लॉक–अपमध्ये लीलाबाईंना ४ महिने काढावे लागले. केसचा निकाल लागल्यावर मग पुन्हा धुळ्याला रवानगी झाली. काही दिवसांनी ठाणा जेलला बदली झाली. प्रारंभी काही राजबंदी स्त्रियांची सोबत होती पण काही महिन्यात त्या सुटल्या.

लीलाबाईंना तो एकांतवास असह्य झाला. बाहेरची काहीच बातमी कळत नव्हती. क्रिमिनल कैद्यात रहावयाचे नाकारून प्रतिकार केल्यावर अंधार कोठडी, पत्रे बंद, मुलाखती बंद इ. शिक्षा त्यांना सहन कराव्या लागल्या. केसाला तेल नाही, साबण नाही

अशा स्थितीत लीलाबाईंनी १ वर्ष त्या तुरुंगात काढले.

साने गुरुजींना ती वार्ता कळली. नंतर गुरुजींच्या प्रयत्नाने बी क्लास झाला व येरवड्याला बदली झाली. येरवड्याला बदली होणार म्हणून लीलाबाईंना खूप हर्ष झाला कारण त्यांच्या मातृतुल्य सासूबाई तेथे होत्या. पण येरवड्यात आल्यावर कळले की त्या खूप आजारी झाल्याने त्यांना मध्येच सोडले होते.

आता मात्र लीलाबाईंना रडू कोसळले, सासू-सूनांचे फार प्रेम होते, लीलाबाई त्यांना आईच म्हणत. एक फायदा मात्र झाला, येरवड्याला आल्यावर एकटेपणा संपला. बाहेरच्या बातम्याही कळ लागल्या. आपला दीर शिवाजी धुळे तुरुंगातून पळाल्याची बातमी कित्येक महिन्यांनी येरवड्याला आल्यावरच त्यांना कळली. मनात वीज चमकली, आपणही भूमिगत कार्य करायसाठी पळून गेलो तर !

जेलमधले पहिल्या वर्ष दीड वर्षातले तंग वातावरण आता काहीसे ढिले झाले होते. पूर्वी राजबंदी स्त्रियांची संख्या अमाप असल्याने भेटी वगैरे बंदच होत्या. पण १९४३ च्या अखेरीस बहुतेक स्त्रिया सुटल्या. त्यामुळे उरलेल्या थोड्याशा राजबंदिनींना भेटी मिळू लागल्या. त्या भेटींतून बाहेरच्या बातम्याही कळू लागल्या.

धुळे खजिना लुटीची बातमी आली. लीलाबाईंना आपल्या पतीच्या-उत्तमरावांच्या पराक्रमाचे कौतुक वाटले. अभिमानाने उर भरून आला. पण दोन महिन्यांनी पंढरपूरला उत्तमरावांना पकडण्यात आल्याची बातमी कळल्यावर त्या हादरल्या. डोळ्यातून अश्रू वाहू लागले. या पकडण्याचा अर्थ होता, प्रदीर्घ शिक्षा, जन्मठेप किंवा फाशी देखील ! शक्तिपात झाल्यासारख्या स्थितीत त्या पडून राहिल्या.

पण दुसरा दिवस आनंदाची बातमी घेऊन उजाडला, सहराजबंदिनी झोपेतून हलवून हलवून उठवीत लीलाला सांगत होत्या, 'अग लीला, तुझा नवरा पोलिसांच्या हातावर तुरी देऊन पळाला.'

सुन्न नजरेने लीलाबाई पहात राह्यल्या. काय ऐकतोय हे जणू त्यांच्या कानात शिरलेच नव्हते. पुन्हा गदागदा हलवल्यावर त्यांना भान आले. जेलमधल्या सर्वच राजबंदी स्त्रिया आनंदित झाल्या. उषा मेहता, मणिबेन पटेल वगैरे. पण यानंतर लीलाबाईंवरची पाळत कडक झाली. त्यांच्या पत्रव्यवहारांतून, भेटीतून काही सुगावा लागेल ही आशा.

अमळनेरचे टी. एम्. पाटील भाऊ बनून लीलाबाईंना एक दिवस भेटायला आले. त्यांनी निरोप आणला, 'अण्णा तुम्हाला भेटायला येणार आहेत' अण्णा म्हणजेच उत्तमराव हे मुलाखतीच्या वेळी हजर असणाऱ्या जेल अधिकाऱ्याला कळले नाही. पण लीलाबाई मात्र लटपटल्या. त्यांना आपल्याकडे येणाऱ्याजाणाऱ्यावरच्या पहाऱ्याची जाणीव होती. घाबऱ्या आवाजात त्या म्हणाल्या, 'त्यांची तब्बेत चांगली नाही, त्यांनी इथं येऊ नये ?' त्यांनी काकूळतीने पाटलांची समजूत काढली.

लीलाबाईंची कंबर अमळनेरच्या माराने अधु बनली होती. ती वारंवार दुखे. तापही मधून मधून येई. शेवटी लीलाबाईंना पुण्याच्या ससून इस्पितळात नेण्यात आले. प्रकृति थोडी सुधारल्यावर सायंकाळी हॉस्पिटलच्या बागेत फिरण्याची परवानगी मिळाली. भिका पाटलांशी संधान जुळवले होतेच.

एक दिवस सायंकाळी अंगात ताप असतानाच लीलाबाई बागेत फिरायला बाहेर पडल्या. भिका पाटील व इतर जवळपास होतेच.

त्यांच्यापैकी दोघांनी जमादार पोलिसाला बोलण्यात गुंतवले. दुसऱ्या दोघांनी पोलिसाला धरून ठेवले, आणखी एकाने त्याच्या नाकावर क्लोरोफार्मचा रूमाल दाबून धरला. बाहेर एक जण सायकल घेऊन उभा होता. लीलाबाई झटकन् बाहेर पडल्या. त्यांना डबल-सीट घेऊन त्या इसमाने सायकल जोरात मारली.




पुण्याच्या हमरस्त्यावरून सायकल जोरात पळत होती. बहुदा तो नोव्हेंबरचा महिना असावा. सायंकाळची वेळ होती. सायकल चालविणाऱ्या सहकाऱ्याने बोळात सायकल वळविली. सायकल स्वाराने डोक्यावरची हॅट फेकून दिली. लीलाबाईंना डोक्यावरून पदराचा घुंघट घ्यायला सांगितले. पोलिसांची गाडी फिरत होती. आडव्यातिडव्या बोळातून बाहेर पडल्यावर सायकल स्वाराने लीलाबाईंना उतरवले. नंतर पुन्हा इकडे तिकडे न्याहाळून सायकल

वरून चंपूताई कऱ्हाडकरांकडे पोचवले. एके ठिकाणी फार राहणे अशक्य होते. पुण्यात लीलाबाईंना सतत मुक्काम हलवावा लागला. फार त्रास झाला. शेवटी एकदा कसे तरी त्या उत्तमराव होते तेथे सातारा जिल्ह्यात पोचल्या व तेथे तूफान सेनेचे काम त्या करू लागल्या.

१४ एप्रिल १९४४ रोजी भूमिगतांनी पश्चिम खानदेशच्या चिमठाणा गावाजवळ सरकारी खजिन्यावर ५॥ लाखांचा दरोडा यशस्वीपणाने घातला. साताराचे क्रांतिकारी व खानदेशचे क्रांतिकारी यांनी संयुक्तपणे ती कृती केली होती. उत्तमरावांचे नातेवाईक खेड्यापाड्यांत असल्याने खजिन्यासह क्रांतिकारी काही काळ काढू शकले. खजिन्याचे वाटप केले. पण पैसा न्यायला कोणी येईना. त्या एवढ्या पैशांचे करायचे काय? ठेवायचे कोठे? उत्तमरावांनी ती जबाबदारी पार पाडली.

किमान सहा महिने तरी लुटीत सामील असलेल्या क्रांतिकारकांनी खानदेश सोडायचा असे ठरवले. उत्तमराव हैद्राबादला पोचले. खजिन्यासह एप्रिलच्या उन्हातान्हातून फिरताना पाय भयंकर पोळले होते. तेथे पायांचे ऑपरेशन झाले. एक महिन्याने पाय बरे झाल्यावर तेथून बाहेर पडण्याचे वेध लागले. सातारा जिल्ह्यांतील भूमिगतांचे केंद्र आटपाडीला. पण तेथे एकदम जाणे धोक्याचे होते म्हणून मग पंढरपूरला जायचे उत्तमरावांनी ठरवले. आषाढी एकादशीची मोठी यात्रा होणार होती. त्या गर्दीत धकून जाईल असा त्यांचा कयास होता.

पंढरपूरला खानदेशचे गुलाबराव पाटील शेतकी खात्यात नोकरीला होते. त्यांच्या घरी उत्तमरावांनी मुक्काम ठोकला. यशवंत पाटील हा लहानगा सहकारी निरोप्याचे काम करी. पण

पाटलांच्या घरात कुजबूज सुरू झाल्यावर उत्तमरावांनी बडव्याच्या घरी मुक्काम हलवला. रेशीमकाठी धोतर, गळचात जानवे, गंधाचा आडवा टिळा, शेंडी, वेलबुटीची टोपी, हातांत पोथी असे सोंग उत्तमरावांनी वठवले,

भटजीची नक्कल बरोबर वठवीत उत्तमराव वेळ कंठित होते. त्याच वेळी आपल्यावर पाळत असल्याचा उत्तमरावांना संशय आला आणि अखेर गुप्त हेराने उत्तमरावांना गाठलेच. त्याला वाटले, उत्तमरावांकडे खजिना लुटीतील २/३ लाख रूपये तरी असतील. तो पैशाची चौकशी करू लागला. उत्तमरावांना पकडले. त्यांच्या राहत्या खोलीचा पंचनामा झाला व पोलिस पहाऱ्यात उत्तमरावांना गावातील लॉकअपमध्ये कोंडले.

उत्तमरावांना काही सुचेना. या कच्चा कैदेतून पळता आले तरच काही आशा; पुढे सर्वस्वी अशक्य. मग जन्मपेठ नाहीतर फाशी. त्यांनी प्रयत्नांती मन शांन केले व कसे निसटायचे त्याचा ते विचार करू लागले. एकदा पोलीसांनी गावाबाहेरच्या एका डाक बंगल्यात उत्तमराव व यशवंत दोघांना चौकशीसाठी नेले होते. गोऱ्या साहेबाने उलटतपासणी घेतली. नंतर कलेक्टरपुढे उभे केले. मग मोटार लॉकअपकडे वळली. दुसऱ्या दिवशी तेथून हलवणार एवढे कळले.

मग जाणवले की आजच्या रात्री पळ काढला नाही तर मग कधीच जमणार नाही. धुळ्याच्या तुरूंगातून पळता येणे शक्यच नाही. कडा पहारा असेल. चिमठाणा केसच्या एका कैद्याला मुळीच ढीलेपणा दाखवणार नाहीत. उत्तमरावांनी लॉकअपमध्ये शिरण्या-पूर्वी आसपास नजर टाकली. चौक, कोपऱ्यात संडास, चौकातून पुढे गेल्यावर ' लॉकअप '. दोन्ही बाजूस बाके व त्यावर पोलिस

बसलेले. "यांना हवे ते जेवायला द्या" उत्तमरावांना पकडणारा अधिकारी आनंदाने हुरळून म्हणाला.

उत्तमरावांनी मटणाचे जेवण हवे म्हटले. पण त्या आधी शौचाला जायचे असल्याचे सांगितले. मग हातकड्या काढण्यात आल्या. बेड्याही काढायला अधिकाऱ्याने सांगितले. जमादार व पोलिस बेडी काढायला उत्तमरावांच्या मागे गेले. पुढे फक्त एक पोलिस होता. डोके चोळण्याच्या निमित्ताने उत्तमरावांनी समोरच्या पोलिसाच्या पोटात कोपराने गुद्दा मारला व चौकात उडी मारली. दरवाजातून बाहेर पडून धूम ठोकली. अवघ्या ३/४ सेकंदात घटना घडली,पोलिस धडाधड उड्या मारून पाठलाग करू लागले.

गुडुप अंधाराचा उत्तमरावांना फायदा मिळाला. अडथळा नको म्हणून त्यांनी अंगातला कोट काढून फेकला व जोरात धावू लागले. भिंतीवरून उडी मारून उत्तमराव हरणाच्या गतीने पळत राह्यले. पुढे एका बोळात शिरले. पळता पळता एका वखारीत शिरल्यावर ओंडक्यावरून भितीवर चढले. भिंतीवरून उडी मारून बोळाबोळात पळू लागले. आता पुढे पाऊल टाकण्याची शक्ति उरली नव्हती. ऑपरेशन नंतर पाय बरे झाले तरी अधु राह्यले होते. पुढच्या बोळात एका संडासाचे मागील भंगीदार दिसले. ते उघडून उत्तमराव हिय्या करून त्या नरकात शिरले. दुर्गंधीने त्यांना हैराण केले. पण पोलिसांना ते असे काही करतील असे वाटले नसावे. संडासाचे दार ठोकून ते पुढे गेले.

बऱ्याच वेळाने उत्तमरावांनी दार किलकिले करून बाहेर पाह्यले. शांत होते. हलकेच बाहेर पडून लपत छपत एका चौकात त्यांनी भिंतीवरून उडी घेतली. ते एक गुदाम होते. अंधारात काही दिसत नव्हते. एका पोत्यात उत्तमरावांनी हात घातला.

त्यांना नागरमोथ्याचा वास आला. बुक्क्याच्या कारखान्यात ते शिरले होते. तेथला सुगंध हुंगून संडासाच्या घाणीचा भिनलेला वास त्यांनी घालवला. दुर्गंधानंतरचा तो सुगंध म्हणजे त्यांना जीवनातल्या चढ उताराचे जणू प्रात्यक्षिकच होते!

खरोखरीची एकादशी घडली होती. लॉकअपमधले मटनाचे जेवणावर लाथ मारून पळ काढला होता. पोटात कावळे कोकलत होते. बाहेर '५॥ लाखाचा सरकारी खजिना लुटलेला आरोपी कोठडीतून पळाला असून त्याला पकडून देणारास वा पत्ता देणारास २५ हजार रुपयांचे बक्षीस मिळेल' अशी दवंडी दिली जात होती. ती उत्तमरावानी ऐकली. एक पोते त्यांनी फोडले. अंगावरले कपडे काढून टाकले. धोतर फाडून लंगोट तयार केला. अंगाला बुक्क्याचे काळे फासून घेतले. अंगाला घाम आलेला होताच. काळा बुक्का घट्ट बसला. पहाटे ३ वाजायच्या सुमाराला कंबरेला अर्ध्या धोतराचे कळकट फडके, उरलेला तुकडा हातात, केसाच्या वळचा व अंग काळेभोर अशा अवतारात उत्तमराव रस्त्यावर आले.

मग एक पाय ओढत लंगड्या चालीने हात नाचवीत 'इठ्ठल, इठ्ठल' म्हणत उत्तमराव चालू लागले, चालही फेंकरी ठेवली. वेड्याचे सोंग बरोबर जमले. तीन चार चौक व पोलिस पार केले. बाजूला गोधडे बुवांची धर्मशाळा होती, कीर्तन चालू होते. फाटकातून आत शिरुन उत्तमरावांनी लोळण घेतली. जवळ पाण्याचा नळ होता, पोटभर पाणी प्याले. कारण रात्री घसा फारच कोरडा पडून असह्य झाल्यावर नाईलाजाने ते शिवांबु प्याले होते. अंधाऱ्या पहाटे काहीजण शौचाला जायला उठले, त्यांच्याबरोबर उत्तमरावही बाहेर पडले. पोलिस येणाऱ्या

जाणाऱ्यांवर नजर ठेवून उभे होते. पण या येडप्पाकडे कोणा पोलिसाने पाहण्याचे कष्ट देखील घेतलें नाहीत. बरोबरच्या सभ्यांना मात्र 'ठैरो' म्हणून हटकले.

आता फटफटायला लागले होते. नदीकाठच्या मसणवटीतल्या मुड्यावरचा लोटा उत्तमरावांनी उचलला. तेथलेच एक लाकूड घेऊन काठी बनवली व पायवाटेने लंगडत चालू लागले. आता चांगलें उजाडलें. २–३ मैलांवर उत्तमरावांना एक गाव लागला. पोलिसांची मोटर गावात पूसतपास करीत होती. एका मळ्यातल्या विहिरीवर तोंड धुतले. एक म्हातारा तेथे आला. तो पोलिसांना शिव्या घालतच म्हणाला, 'कुणी खजिना लुटणारा पळालाय अन् त्याच्यामागं हे धावताहेत म्हणे !'

जवळ पैसा नव्हता. वेश नंग्या बाबाचा. अंग बुक्क्याने काळे झालेले. न रेल्वेत बसता येणार होते न मोटरीत. भर दुपारची वेळ. वर चटके व पायाखाली चिखल भुकेने तर काहूर माजवले होते. आता अगदी नाईलाज झाला. उपास तरी किती काढायचे ? शेवटी उत्तमराव गावात शिरले. 'भाकर दे ग माय' एक दोन घरी हाकलले. पण मग शिळी भाकर, आंबलेलं पिठलं, नासायच्या बेतातली उसळ असे अन्न मिळाले. जवळच्या ओढ्यावर जाऊन त्या पक्वान्नांचा त्यांनी समाचार घेतला व रात्रीचा प्रवास सुरू झाला.

सोलापूर हद्दीतील एखतपुरला पोचल्यावर खादी ग्रामोद्योग केंद्राच्या मामा चितळ्यांकडे गरम पाण्याने आंघोळ केली व तीन दिवसांचा उपास सोडला. त्यानंतर पलायनाच्या ५ व्या दिवशी सातारा जिल्ह्यातील माडगूळला ते पोचले. माडगूळकरांच्या घरासमोर उत्तमराव कटोरा घेऊन भिक्षा मागू लागले, वासू


माडगूळकरला त्याच्या आईने म्हटले. 'हाकल रे मेल्याला अलीकडे गुप्त हेरांचा सुळसुळाट झालाय.'

वासू माडगूळकर व उत्तमरावांची दृष्ट भेट झाली व वासूच्या हातातला उत्तमरावांवर उगारलेला सोटा वरच्यावर राह्यला. वासूने खूण केली, त्याच्या मागोमाग येण्याची. यशवंताला घेऊन वासू चालू लागला. उत्तमराव हळूहळू मागून जाऊ लागले.

आटपाडी खादी ग्रामोद्योग केंद्राचे धुडकू भाऊ ठाकरे संपर्क माध्यम होते आणि एक दिवस मुख्य अड्ड्यावर जायला उत्तमराव निघाले. पावसापाण्यांतून चिखल तुडवीत बरीच तपस्या केल्यावर नाना पाटलांची व त्यांची भेट झाली. पुढे मग ते पारे गावी पोचले. पारे गावचे शामराव पाटलांचे घर म्हणजे भूमिगत जीवनातील रखरखीत उन्हाळ्यात सुखद झुळुक देणारा स्वर्गच होता. मधून मधून त्या स्वर्गात थोडा वेळ राहून पंखांत हवा भरून घेऊन भूमिगत पुन्हा भरारी मारत.

☆

म. ग्रं. सं. ठाणे, [illegible] शाखा.
[illegible] विभाग
दा. क्र. २०५८ दिनांक ७।७।८५
विषय बा-का. क्र. ........



# छन्नूसिंग–किसनवीर आदि

सोलापूरचे भाई छन्नूसिंग, भाई विभूते, साताऱ्याचे किसन वीर प्रभृती कार्यकर्ते येरवड्याच्या कारागृहात होते. बाहेर चळवळीला उधाण आले असताना आपण तुरुंगात बंदिवान होऊन पडलो आहोत याची त्यांना खंत वाटत होती. किसन वीर स्वतःच्या काहीशा भोळसट वागणुकीमुळे पकडले गेले होते. त्यामुळे त्यांचे मन त्यांना खात होते. काहीही करून येथून सुटले पाहिजे, असे त्यांच्या मनाने घेतले.

त्या विचारात मन गढले असताना एक दिवस संध्याकाळच्या वेळेला तीन नंबरच्या बराकीबाहेरची तटबंदी किसन वीर न्याहाळीत उभे होते. समोरून छन्नूसिंग चंदेले येत होते. एकाग्र चित्ताने तुरुंगाची तटबंदी न्याहाळीत असलेले किसन वीर पाहून

छन्नूसिगांना आश्चर्य वाटले. अर्धवट थट्टेने, अर्धवट गंभीरपणाने ते किसन वीरांना उद्देशून हसत हसत म्हणाले.

" क्यों वीर, क्या देखते हो ? कूद मारने की सोच रहे हो क्या ? "

काहीशा तंद्रीतच किसन वीरांनी उत्तर दिले, " हां, हां, क्यों नहीं ? यहाँ बैठकर क्या करेंगे ! हमें अंदर रहना अच्छा नहीं लगता ।"

त्या दिवशी एवढेच बोलणे झाले. परस्परांचा फारसा परिचय नव्हता. एकमेकांच्या मनाचा आणि विचाराचा अंदाजही लागला नव्हता. त्यामुळे ते बोलणे तेवढ्यावरच राहिले. मात्र छन्नूसिग आणि किसन वीर दोघांच्याही मनात एकच विचार तुरुंगात आल्यापासून घोळत होता. तुरुंगात कुजत पडायचे नाही. तुरुंगाच्या तटावरून छलांग मारायची आणि बाहेर चालू असलेल्या तुफानात स्वत:ला झोकून द्यावयाचे. जेलमध्ये आल्या आल्याच किसन वीरांच्या छन्नूसिग यांच्याबरोबर परिचय झाला होता. त्या दिवशी संध्याकाळी तटाकडे पहात उभे असताना दोघांची मने जुळली. योजना शिजू लागली. पुण्याचे पैलवान बलदेवप्रसाद पहिलवान त्याच बराकीत होते. त्यांच्याकडे या योजनेचे सूतोवाच उभयतांनी केले. पैलवानही अस्वस्थ होता. पिंजऱ्यात कोंडलेल्या सिंहासारखा तो बराकीतल्या बराकीत फेऱ्या मारीत होता. तुरुंगातून निसटून जाण्याची कल्पना बलदेवप्रसादना नामी वाटली. सोलापूरचे कार्यकर्ते व कामगार पुढारी भाई विभुते त्यांना येऊन मिळाले. साताऱ्याचे पांडू मास्तर त्यांच्या विचाराशी सहमत झाले. मग योजनेला स्पष्ट आकार येऊ लागला.

तुरुंगाच्या तटबंदीची बारकाईने पहाणी केल्यावर आढळून

आले की, तुरुंगाची तटबंदी तशी फारशी दुर्लंघ्य नाही. येरवडा प्रिंटींग प्रेसच्या बाजूला रात्रीच्या वेळी तसा अंधारच असतो. तटाबाहेरचा भागही निर्मनुष्य असतो. एखादा भक्कम दोर व शिडी मिळविता आली तर काम फत्ते करणे शक्य आहे. मग छन्नूसिंग आणि किसन वीर त्या कामाला लागले. 'दाम करी काम' हे त्या दोघांनाही ठाऊक होते. तोंडाला पाणी सुटून ते ओठांबाहेर पाझरू लागेल एवढे आमिष त्यांनी जेलमधल्या एका हवालदारापुढे धरले आणि दोन शिडया व दोर मिळण्याची तजवीज झाली.

मग आपल्या बेतात आणखी कोण कोण सहभागी व्हावयास तयार आहेत याची चाचपणी सुरु झाली. सातान्याचे ज्येष्ठ कार्यकर्ते नाथ घाणेकर त्याच बराकीत होते. मार्क्सवादी तत्वज्ञानाचे अभ्यासक म्हणून त्यांचा लौकिक होता. त्यांच्या विचारावर 'लाल' सावट होती. तथापि राष्ट्रवादी परंपरेचे ते पाईक होते म्हणून प्रारंभीच्या काळातच सरकारने त्यांना पकडून येरवडयाला स्थानबद्ध केले होते. त्यांचा हा लौकिक किसन वीरांना ठाऊक होता. ते मोठ्या अपेक्षेने त्यांच्या जवळ गेले व तुरुंग फोडून बाहेर पडण्याचा विचार त्यांच्या जवळ प्रगट केला. त्यांची अपेक्षा होती, नाथ घाणेकर म्हणतील, " चला, मीही तुमच्या बरोबर येतो. "

परंतु घाणेकरांनी त्यांची निराशा केली. ते म्हणाले,

" अरे, तुम्ही फारच वाईट गोष्ट करीत आहात. तुम्ही जेलमधून फरारी झालात तर आमच्या सगळ्या सवलती बंद होतील. सर्वांनाच त्रास होईल. हा विचार तुम्ही मनातून काढून टाका."

राष्ट्रप्रेमाने भारून जाऊन नाथ घाणेकरांनी केलेला त्याग, उपसलेले असीम कष्ट किसन वीरांना ठाऊक होते. त्यांचे व्यक्ति-

गत आणि सार्वजनिक जीवन त्यांनी जवळून पाहिले होते. त्यामुळे आज ह्या योजनेत ते सहभागी होतील असे त्यांना वाटत होते. त्यामुळे त्यांचे उद्‌गार ऐकून त्यांची निराशा झाली. त्यांना वाईट वाटले. विषण्ण मनाने ते नाथ घाणेकरांच्या जवळून उठून गेले. मात्र या घटनेमुळे की काय कोण जाणे. तुरुंगातून निसटण्याचा त्यांचा विचार अधिकच पक्का झाला. आता आणखी कोणा-बरोबर चर्चा न करण्याचे त्यांनी ठरविले व योजना पक्की करण्याच्या उद्योगाला लागले.

एकोणीसशे बेचाळीस सालच्या ऑक्टोबर महिन्याच्या एकतीस तारखेच्या रात्रीच्या नऊ वाजतांचा मुहूर्त तुरुंगातून बाहेर निसटून पडण्यासाठी मुक्रर करण्यात आला. स्थानबद्ध कैदी आपापल्या बराकीत विसावले होते. कोणी पत्ते खेळत होते. कोणी बिस्तऱ्याला पडून वाचीत होते. कोणी आपापसात गप्पागोष्टी करीत होते.

त्यांच्यातील ते पाच स्थानबद्ध हळूच बराकीच्या बाहेर पडले व एकेक करीत तटाजवळ जाऊन पोहोचले. दडवून ठेवलेली शिडी बाहेर निघाली. अंधारात तटाला लावली गेली. छन्नूसिंग प्रथम शिडी चढून वर गेले व तटाच्या बाहेर उभ्या केलेल्या शिडीवरून उतरून गेले. त्यांच्या पाठोपाठ पांडू मास्तर निसटले. मग किसन-वीर शिडीवर चढले. एकेक पायरी चढत गेले, तटावर पोहोचले. बाहेरच्या शिडीच्या पायऱ्या उतरू लागले. आणि घोटाळा झाला. पहाऱ्यावरच्या शिपायाच्या पावलांचा आवाज ऐकू येऊ लागला. आतल्या शिडीवर अर्ध्यावर चढलेले भिंतीला पालीसारखे चिकटून बसले. पहाऱ्यावरच्या शिपायाच्या हातातला कंदील हळूहळू दूर गेला. तेव्हा तटाच्या आत शिडीला चिकटून बसलेले घाईघाईने शिडी चढून तटावर आले, बाहेरची शिडी उतरू लागले. किसन-

वीर शिडीच्या शेवटच्या पायऱ्या उतरत होते. विभूते शिडीच्या मध्याला पोहोचले होते आणि पैलवान बलदेव शिडीच्या दुसऱ्या तिसऱ्या पायरीवर होते. त्या तिघांचा भार शिडीला पेलला नाही. शिडी मोडून खाली पडली व तिच्या बरोबर विभूते आणि बलदेव प्रसादही धरणीवर कोसळले. विभूत्यांना खरचटण्या पलीकडे फारसे काही झाले नाही. पैलवानाच्या पायाला मात्र जबर मार लागला. तो चांगलाच मुरगळला होता.

तटावरून खाली उतरताच छन्नूसिंग व पांडू मास्तर एका बाजूला पळाले. उरलेले तिघे दुसऱ्या बाजूला निघाले. बलदेव प्रसादांचा पाय त्यांना जागचे हलू देत नव्हता. ते पुण्याचे. शहराची माहिती असलेले. म्हणून तुरुंगातून निसटताच त्यांच्या मार्गदर्शनाखाली सर्वांनी लपतछपत पुणे गाठायचे असे ठरले होते. पण पैलवानच जायबंदी झाल्यामुळे सारेच मुसळ केरात गेले. आखलेली योजना पैलवानांच्या बरोबर ढासळली. बलदेव प्रसाद हालचाल करीत नाहीत, बसल्या जागेवर विव्हळत आहेत आहेत असे पाहून किसन वीर व विभूते मागे परतले. पैलवानांच्या दोन्ही काखेत दोघांनी हात घातले व त्यांना उभा करून आपल्या बरोबर ओढीत-नेले. एकेक पाऊल टाकीत ते तुरुंगाच्या तटापासून दूर जात होते. पाठीमागे त्यांना जेलच्या तटावर इकडून तिकडे नाचत असलेल्या मशाली दिसत होत्या. धोक्याचा इशारा देणाऱ्या घंटांचा घण-घणाट ऐकू येत होता. मागच्या लोकांना, पुढे गेलेल्या छन्नूसिंग व पांडू मास्तरांना गाठण्याची घाई झाली होती. किसन वीर दबलेल्या आवाजात "भाई भाई" म्हणून हाका घालीत होते. पांडू मास्तर आणि छन्नू सिंग अंधारात दिशाहीन पळत होते. पुढे गेलेले आणि मागे राहिलेले यांच्या मधले अंतर हळूहळू वाढत

होते. काळजीपूर्वक तयार केलेली योजना विस्कटून गेली होती किसन वीर, बलदेव प्रसाद आणि विभूते अंधारातून झपाट्याने चालत होते. कोणीकडे जात आहोत ते त्यांना कळत नव्हते, पण ते आळंदीच्या रस्त्याला लागले होते. बलदेव प्रसादांच्या मुरगळलेल्या पायातून असह्य कळा येत होत्या. त्यांना पाऊल उचलेनासे झाले. अखेरीस त्यांनी रस्त्यावर बैठक मारली. 'तुम्ही जा पुढे.. माझ्याने आता चालवत नाही, निदान तुम्ही तरी निसटा,' असे ते आपल्या दोन सहकाऱ्यांना म्हणू लागले. पण त्यांना तेथे तसेच सोडून द्यावयाचे म्हणजे पाठलागावर असलेल्या पोलिसांच्या स्वाधीन करण्यासारखेच होते. जवळून एक ओढा वहात होता. ओढ्यावर पूल होता. किसन वीर आणि विभूते यांनी पैलवानाचे दोन्ही बाजूनी दोन बखोटे धरले व त्या पुलाखाली जाऊन तिघेही



दडून बसले. अंधाराने त्यांच्यावर सावट धरून त्यांना झाकून टाकले. रातकिडे किर्रर्रऽऽ आवाज करीत त्यांना सोबत करीत होते.

जेलच्या बाहेर पडून काही शिपाई हातात मशाली घेऊन, जेल फोडून बाहेर पडलेल्या कैद्यांचा शोध घेत धावत होते. त्यांच्यापैकी तिघेजण त्या पुलावर आले. पुलाखाली खळखळ आवाज करीत ओढा वहात होता. वेगाने वहाणाऱ्या त्या पाण्याच्या प्रवाहाकडे पहात एक शिपाई आपल्या सहकाऱ्याकडे वळून म्हणाला, "साले, पाण्यातूनच पलीकडे गेलेले दिसतात." आणि ते पूल ओलांडून पलीकडे गेले व निसटलेल्या कैद्यांचा पाठलाग करीत दिसेनासे झाले. आता रात्रीचे बारा वाजून गेले होते. लपतछपत केलेल्या तीन तासांच्या प्रवासात फारसे अंतर काटले गेले नव्हते. अजूनही ते येरवड्याच्या परिसरातच होते. थोड्या वेळाने ते पुलाखालून बाहेर आले व जणू काही आपण त्या रस्त्यावरून जाणारे वाटसरू आहोत असे भासवीत चालू लागले. परंतु अंधारात ते रस्ता चुकले होते. लोहगाव विमान तळाच्या परिसरात ते पोहोचले होते. हे लक्षात आले आणि त्यांच्या हृदयात पुन्हा धडधड सुरू झाली.

लोहगाव विमान तळाचा परिसर नागरिकांच्यासाठी बंद करण्यात आला होता. लष्कराच्या ताब्यात तो दिलेला होता. अंतरा अंतरावर पहारा करण्यासाठी लष्करी जवान ठेवलेले होते. किसन वीरांनी एक धाडसी निर्णय घेतला. त्यांनी जवळच पहारा करीत असलेल्या जवानाला गाठले व सांगितले, "आम्ही कॉंग्रेसचे कार्यकर्ते आहोत. जेल फोडून बाहेर पडलो आहोत. आम्हाला शोधण्यासाठी शिपाई हिंडत आहेत, आमचा पाठलाग करीत

*आहेत. खरं ते सांगतोय, आम्हाला साथ द्या, आम्ही इकडून गेलो* हे त्यांना सांगू नका." ते जवान सर्दच झाले. थोड्या वेळाने त्यांच्या पैकी एक जण म्हणाला. " जाओ बेफिकीर जाओ. खुदाकी कसम, किसीको नहीं बोलूंगा "

लंगड्या पैलवानाला बरोबर घेऊन त्या दोघांची पायपीट पुन्हा चालू झाली. एका गावाजवळ ते पोहोचले. त्या गावावर नुकताच दरोडा पडून गेला होता. लोक घाबरलेले होते. रात्रीचा पहारा करण्यासाठी गावकऱ्यांनी एक भय्या ठेवला होता. या तिघांची चाहूल लागताच गावातली कुत्री केकाटू लागली. एका दुकानाच्या ओटयावर काही माणसे झोपली होती. कुत्र्यांच्या भुंकण्याच्या कल्लोळाने ती जागी झाली. त्या लोकांनी काही विचारण्याच्या आतच किसन वीरांनी त्यांना विचारले.

" गावात कुणी काँग्रेसचा माणूस आहे का ?"

त्यावर तुम्ही कोण ? कुठले ? एवढ्या रात्री कोठे निघालात वगैरे चौकशी साशंक मनाने त्यांनी चालविली.

किसन वीरांनी सांगितले, "आम्ही हडपसरला जायला निघालो आहोत. रात्रीच्या अंधारात वाट चुकलो. आम्हाला हडपसरची वाट दाखवा."

एवढ्यात गावात राखणीसाठी ठेवलेला भय्या हातातली काठी आपटीत व कंदिल हालवीत तेथे येऊन त्याच्या भाषेत काही बोलणार तोच त्याने हातातला कंदील वर केला. आश्चर्याने तो उद्‌गारला,"

" कौन ? बलदेव भाई ! आप यहाँ ? "

ओळख पटली. तिघांनी सुटकेचे निश्वास सोडले. एव्हाना तांबडे फुटू लागले होते. नंतर भय्याने त्यांना हडपसरला पोहोचते केले. एका शेतात त्यांनी मुक्काम ठोकला. दुपारपर्यंत त्यांनी विश्रांती घेतली. मग पुण्याला निरोप पाठवायची व्यवस्था झाली. शरद मराठे स्वतःची मोटार घेऊन आले. तिघे जेल फोडे त्या मोटारीतून सदाशिव पेठेतल्या मराठ्यांच्या वाड्यात जाऊन पोहोचले. पहातात तो छन्नूसिग आणि पांडू मास्तर तेथे हजर.

किसन वीरांनी त्यांना विचारले, "तुम्ही कसे आला ?"

पांडू मास्तर म्हणाले, "जेलमधून बाहेर पडल्याबरोबर आम्ही सुसाट पळत रस्त्यावर आलो. तेथून एक टांगा चालला होता त्यात बसलो आणि सरळ इकडे आलो. पण आबा, तुम्ही कसे आला ?"

किसन वीर म्हणाले "अगोदर पायातले काटे काढतो आणि मग आम्ही कसे आलो ते सांगतो."

दोन दिवसांनी छन्नूसिग आणि विभूते यांना पुण्याहून रेल्वेने मुंबईला सुखरूप पोहोचते करण्यात आले. पांडू मास्तर, किसन वीर प्रभृती नेत्यांची पाठवणी प्रतिसरकारच्या मुलुखात साताऱ्याला करण्यात आली !

☆

२०७८

# इतर फरार

जेलमधून पलायनाची छोटी छोटी प्रकरणे तर सर्व देशभर घडलेली आहेत. कितीक प्रसंगांचा शोधही घेतला गेला नसावा.

देशभरचे प्रमुख जेल अतोनात भरले होते. कैदी कोठें ठेवायचे याची पंचाईत होती. जेलबाहेर साधे तारांचे कम्पाऊण्ड घालून जेथे कैद्यांना ठेवले होते तेथून तर पळणे खूपच सोईचे होते. असे तर खूपच पळले असले पाहिजेत. उदाहरणार्थ येरवड्याबाहेरच्या कॅम्पमधून तारांचे कुंपण ओलांडून पुण्याचे निळूभाऊ लिमये पसार झाले होते.

४२ च्या ‘छोडो भारत’ आंदोलनात गांधीजींनी ‘तुम्ही स्वतंत्र आहांत असे समजून वागा. तुरुंगात जाऊन बसण्याचे तंत्र आता जुने व नि:सत्व झाले आहे” असा संदेश दिल्याने युवजनांच्या उत्साहाला उधाण आले होते.

देशभर जरी जेल पलायनाच्या घटना घडल्या असल्या तरी बिहार प्रांताचे 'जेल तोडो' किंवा 'जेलसे भागो' हे वैशिष्टय होते. कोणी जेल फोडून बाहेर पडले तर कोणी संधि साधून पळाले. काही ठिकाणी जनतेने आपल्या सामर्थ्यावर राजबंद्यांना सोडवले तर काही ठिकाणी जेलर वार्डर वगैरेंनी सहाय्य केले. काही वेळा कैद्यांची बदली होताना रस्त्यातून कैदी पळाले आहेत.

१३ ऑगस्टला दुपारी सरस्वती देवी आणि आणखी एक महिला राजबंदी यांना हजारीबाग तुरुंगातून भागलपुर सेंट्रल जेलमध्ये नेत होते. त्यांना नाथनगर येथे जमावाने सोडवले व मिरवणुकीनें भागलपुरला आणले. तेथे सरस्वतीदेवींचे स्फूर्तिदायी भाषणही झाले.

हाजीपूर तुरूंगातून ७९ राजबंद्यांना जनतेने सोडवले. १७ ऑगस्टला मधुबनी (दरभंगा) तुरुंगातील २८ राजबंद्यांनी जेल सुपरिटेंडेंटला बंद करून पळ काढला. बेगसराय जेलमधूनही सायंकाळच्या वेळी काही कैदी पळाले. १६ ऑगस्टलाच राज-बंद्यांना गोड्डा येथून दुमका येथे मोटार बसने नेण्यात येत होते. वाटेत त्यांना अडवून प्रक्षुब्ध जमावाने ९ जणांना सोडवले. लोहर-दगा येथील विद्यार्थ्यांनी जेलबाहेर निदर्शने केली. त्यांच्या घोषणा ऐकून कैद्यांनी जेलर-वार्डरना बंद करून जेलबाहेर पडण्याचा असफल प्रयत्न केला.

७ राजबंद्यांना पाटणा जेलमध्ये नेलें जात होते. रेल्वे बंद असल्याने पुन्हा मधुपुरला परत जात असता गिरीडीह स्टेशनवर ३–४ हजारांच्या जमावाचा कैद्यांना सोडवण्याचा प्रयत्न फसला. १५ ऑगस्टला प्रक्षुब्ध जमावाने बकसर सेंट्रल जेलवर हल्ला

करून जेलचे मुख्य फाटक उघडले जेलमध्ये शिरताच गोळीबार सुरु झाल्याने पुढे मात्र राजबंद्यांना ते मुक्त करू शकले नाहीत.

मुझफ्फरपुरला जेलच्या फाटकाची किल्ली वार्डरने जनतेच्या हवाली केली आणि जेल खोलण्यात आला. २७ ऑगस्टला सकाळी सकाळीच राजबंद्यांनी पूर्णिया तुरुंगाचे दोन सेल्स फोडले. पण जेल अधिकाऱ्यांच्या सावधगिरीमुळे त्यांना पळणे शक्य झाले नाही.

१९४२ च्या मे, ऑगस्ट–सप्टेंबरमध्ये बिहारमधील खवळलेल्या जमावाने हल्ला करुन अनेक तुरुंग फोडले व राजबंद्यांना सोडवले. ७/८ शे कैदी आरा जिल्हा तुरुंगातून मुक्त करण्यात आले. मधुबनी, हाजीपूर अनुमंडल जेल मधुनही सुमारे १०० कैद्यांना मुक्त केले गेले. गोड्डा, दुमका, बेगसराय मधूनही कैद्यांना सोडवले गेलें.

गोड्डा तुरुंगातून ६१ राजबंदी पळाले.

बांकीपूर तुरुंगातून फुलवाडी कँम्प जेलकडे नेताना २४ राजबंद्यांना मोटारीवर हल्ला चढवून जमावाने बंधमुक्त केले. बक्सर, सिकारी, रिघवारा, बेलहर, संभाळ परगणा, सीतामढी, कसबा अशा आणखीही अनेक ठिकाणी असे प्रयत्न झाले.

तुरुंगांची दारे कुलुपे तोडून खोलण्यात येऊन राजबंद्यांना सोडवण्याचे प्रयत्न द्रमका, डाल्टनगंज, गोंडा थानाबिहार, रांची अशा कैक ठिकाणी झाले. काही सफल काही असफल. मधुबनी तुरुंगातील २८ राजबद्यांनी जेल सुपरिटेंडेटला कोठडीत बंद केले व ते फरारी झाले.

उत्तर प्रदेशातील आझमगड शहरातील एका रस्त्यावर पोलिसाला घेराव करून विद्यार्थ्यांनी राजबंद्यांची मुक्तता केली.

उ. प्र. त अनेक जिल्ह्यांत ब्रिटिश शासन नष्टच झाले होते.




महाराष्ट्रातही जेलमधून पळून जाण्याच्या कैक घटना घडल्या. रामटेकला जमावाने पोलीस ठाण्यावर हल्ला करून कैद्यांची मुक्तता केली. नाशिकलाही राजबंद्यांना कोर्टात नेत असताना सोडविण्याची घटना घडली. जयसिंगपुर कोर्टात खटल्यासाठी नेण्यात येत असलेल्या राजबंद्यांनी बंदोबस्तासाठी आलेल्या पोलिसांची हत्यारे काढून घेऊन पलायन केले. साताराला तर प्रतिसरकारच असल्याने राजबंद्यांचा प्रश्नच नव्हता.

गारगोटीच्या सब् जेलचे टाळे तोडून कैद्यांची मुक्तता क्रांतिकारकांनी केली. सातारा सब् जेल मधून नागनाथ नायकवडी यांनी पलायन केले. शिवाजी सावंत यांनी रत्नागिरीच्या तुरुंगातून

पोबारा केला.

लालसेनेचे रामसिंग गौर व ठाकूर निरंजनसिंह यांनी नागपूर तुरुंगांतून पोबारा केला.

कर्जत लॉकअपमधुन नेरळ–कर्जत क्रांतीतले क्रांतिकारक चांदोबा देहरकर, पै, भोळे व मधु आंबवणे यांनी भिंतीवरून उड्या टाकून पळ काढला. त्यांना याकामीं तुरुंगांतल्या त्याच्या सहकारी कातकरी कैद्यांनी मदत केली.

बंगालमध्ये चितगाव तुरुंगात तर वॉर्डर्सनीच संप केला व तुरुंगाचा कारभार बंद पाडला.

तामिळनाडूतील घटना तर अद्भूत आहे. देवकोट्टाइचे दोन लोकप्रिय नेते सबजेलमध्ये बंद होते. त्यांना सोडविण्यासाठी १८ ऑगस्ट रोजी सुमारे २५ हजार शेतकऱ्यांचा जमाव कुदळी फावडी व कोयते घेऊन भिरुवादनायी या तालुक्याच्या गावी असलेल्या सबजेलवर चाल करून गेला. जेलचे टाळे तोडून संतप्त जमावाने आपल्या दोन नेत्यांना आणि आणखीही ३० राजबंद्यांना मुक्त केले.

इंदूर जवळच्या मंडलेश्वर तुरुंगातील राजबंद्यांनी पहारेकऱ्यांवर आक्रमण करून तुरुंगाची कुलपे तोडली व आपली मुक्तता करून घेऊन ते शहरात आले. मिरवणुक काढली. सभेत भाषणे केली व पुन्हा तुरुंगात परत गेले.


ओरिसातही राजबंद्यांना सोडवण्याचे काही प्रयत्न झाले. खैरा-पोलिस स्टेशनमध्ये अटकेत असलेल्या काही राजबंद्यांना आंदोल-कांनी स्टेशनमध्ये घुसून मुक्त केले. विझापूरला देखील ३ हजा-

रांच्या जमावाने असाच प्रयत्न केला. पण तो यशस्वी झाला नाही. कोसाला येथे एका नेत्याला अटक करावयास आलेल्या दोन सब-इन्स्पेक्टर्सवर व एका इन्स्पेक्टरवर हल्ला करून त्यांना जखमी केले.

त्रितोली येथे २ हजारांच्या जनसमुदायाने आपल्या नेत्याची पोलिस कस्टडीतून सुटका केली.

अशाप्रकारे तुरुंगांत सडत राहणे नाकारून वरील सर्वांनी आपला जीव धोक्यांत घातला आणि केवळ जेलबाहेर पडले असें नव्हे तर पुन्हां क्रांति कार्यांत उडी घेतली.

☆



म. ग्रं. सं. ठाणे, ... शाखा.
दा. क्र. २०७८ ... ११।१।८५
विषय वाची क्र. . . .

# भूमिगतांच्या गंमती

अच्युतराव चलेजाव आंदोलनाचे एक वरिष्ठ नेते.

अच्युतराव पटवर्धन भूमिगत असताना 'साहेब' बनले होते, म्हणजे साहेब हे नाव त्यांना देण्यात आले होते. हा 'साहेब' खरोखरीच साहेब दिसत असे. हॅट, बूट, पँट असा त्यांचा पोशाख बहुधा असे. त्या पोशाखात मुंबईत ते निर्धास्तपणे वावरत. एकदा आंदोलनाच्या सुरवातीच्या काळात परदेशी कापडाची होळी पेटविण्यात काही तरुण गढले होते. बराच मोठा जमाव त्यांच्या भोवती जमला होता. लोक घोषणा देत, टाळ्या पिटत त्यांना उत्तेजन देत होते. रस्त्याने येणाऱ्या जाणाऱ्यांच्या डोक्यावरच्या टोप्या काढून घेतल्या जात होत्या. होळीत भिरकावल्या जात होत्या. यावेळी अच्युतरावांनी डोक्यात हॅट बहुधा घातली नसावी. ते त्या तरुणांच्या जमावा जवळ गेले. जमावात सामील होऊन

होळी पहात राहिले. टाळ्या पिटणाऱ्या तरुणांच्या बरोबर त्यांनीही टाळ्या वाजविल्या आणि जसे ते आले होते तसेच ते नाहीसे झाले. अच्युतराव पटवर्धनांचे व्यक्तिमत्व लपून रहाणारे नव्हते लाखात उठून दिसणारे त्यांचे व्यक्तिमत्व असल्यामुळे एकदा पाहिल्यावर ते विसरणे तसे अवघडच होते. त्यातून काँग्रेसच्या कार्यकारिणीचे सदस्य, काँग्रेसचा एक वरिष्ठ नेता, अशी त्यांची कीर्ती अगोदरच झालेली होती. तरीही ते अखेरपर्यंत भूमीगत राहिले. त्यांच्या विषयीच्या आदराच्या भावनेपासून पोलिस दलही अलिप्त नव्हते. भूमिगत असलेल्या काळात अनेक वेळा पोलिसांच्या बरोबर त्यांची नजरानजर झाली होती. कित्येकांनी त्यांना इकडून तिकडे जाताना पाहिले होते आणि ओळखले होते. तथापि देशातल्या ब्रिटिश सरकार विरोधी लढ्याचे नेतृत्व करणाऱ्या महाभागाला अटक केल्याचे पातक आपल्या खाती जमा करण्याची संधी शक्यतो आपण देऊ नये असे त्यांना वाटत असे. अच्युतरावांना पाहूनही ते न पाहिल्यासारखे करीत. एखाद्या वेळी चुकून माकून, समोरा-समोर गाठ पडलीच तर नमस्कार करून पुढे सटकत. मात्र हे फक्त देशी पोलीसांच्या बाबतीतच काय ते तेवढे खरे होते. गोरे–अँग्लो-इंडियन पोलीस पिसाळलेल्या कुत्र्यासारखा त्यांचा पाठलाग करीत होते.

मुंबईसारख्या मोठ्या अवाढव्य बहुरंगी शहरात भूमिगत रहाणे अच्युतरावांना फारसे अवघड नव्हते. समाजाच्या विविध थरात त्यांच्या ओळखी होत्या. त्यांचे चहाते सर्वदूर विखुरलेले होते. खास श्रीमंतांच्यासाठी असलेल्या वसाहतीतल्या एखाद्या निवांत महालात कधी त्यांचा मुक्काम असे तर कधी एखाद्या बड्या सरकारी अधिकाऱ्याच्या घरीही ते आसरा घेत. असा आश्रय

शोधताना जात, धर्म, पंथ कधी त्यांच्या आड आला नाही. एखाद्या बड्या लष्करी अधिकाऱ्याची पत्नी सुद्धा त्यांना आपल्या घरात ठेवून घेई. सरकार दरबारी वट असलेला आणि अगदी थेट राज्याच्या गव्हर्नरापर्यंत वहिवाट असलेला उद्योगपती सुद्धा अच्युतरावांना आपल्याकडे ठेवून घेई आणि आपले आलीशान वाहन दिमतीला देऊन त्यांची पाठवणीही करत असे. सुप्रसिद्ध कादंबरीकार कै. प्रा. ना. सी. फडके व सौ. कमला फडके यांनीही त्या काळात अच्युतरावांचा पाहुणचार केला होता.

नाना पाटलांच्या भूमिगत जीवना भोवती त्या काळात एक अदभूततेचे वलय निर्माण झाले होते. प्रतिसरकारची प्रत्यक्ष स्थापना होऊन त्या सरकारचा कारभार सुरू झाल्यानंतर नाना पाटलांचा मुक्काम बहुश: कुंडलच्या गढीतच असे. त्या परिसराच्या बाहेर ते फारसे पडले नाहीत व बाहेर पडण्याचे त्यांना कारणही पडले नाही. तथापि प्रसंगवशात त्यांनाही बाहेर पडावेच लागे व तसे बाहेर पडल्यावर पाठलागावर असलेल्या पोलिसांना चकविण्यासाठी नाना हिकमती त्यांना कराव्या लागत. एकदा असेच ते पाठलागावर असलेल्या पोलिसांना झुकांड्या देत पळत होते. पोलिसांना त्यांचा पक्का माग लागला होता. वेळ रात्रीची. कृष्ण पक्षातले धूसर चांदणे पडले होते रानातून, शिवारातून वाट काढीत नाना पाटील जात होते. त्यांच्या मधले व पाठलाग करणाऱ्या पोलिसांमधले अंतर झपाट्याने कमी होत होते. पुढे सगळा उघडा-धोंडा माळ दिसत होता. लपत छपत वाटचाल करायला झाडीही कोठे दिसत नव्हती. थोड्या अंतरावर एक झोपडी मात्र दिसत होती. कोणा शेतकऱ्याची ती शिवारातली वस्ती होती. नाना पाटलांनी मनाशी थोडा विचार केला. झर-

झर चालत ते झोपडी जवळ गेले व कुडाच्या दारावर त्यांनी थाप दिली. एका मध्यम वयाच्या शेतकऱ्याने दार उघडले. नाना पाटील त्याला म्हणाले, " मी नाना पाटील, पोलीस पाठीवर आहेत..." नाना पाटलांना अधिक काही सांगावे लागले नाही. शेतकऱ्याने नाना पाटलांना आत घेतले. एका कोपऱ्यात त्या शेतकऱ्याची पत्नी आणि लहान मूल गोधडीवर वाकळ पांघरुन झोपले होते. शेतकऱ्याने पत्नीला काही तरी सांगितले. मग त्याच्या पत्नीच्या शेजारी वाकळ पांघरुन नाना पाटील झोपलें शेतकऱ्याने दुसरी घोंगडी उचलली. चिलीम बरोबर घेतली. झोपडीचे दार लावून घेतले आणि दाराबाहेरच्या ओटचावर घोंगडी पसरून तो बसला आणि निवांतपणे चिलमीचे झुरके घेऊ लागला.

इतक्यात अपेक्षेप्रमाणे पोलीस तेथे येऊन धडकलेच. त्यांनी शेतकऱ्याला हटकले, " आता इतक्यात इकडून कोणी गेले का ?" असे विचारले, तेव्हा तो शेतकरी म्हणाला,

" न्हाई बा, मी तर न्हाई कोणाला इकडन् जाताना बघितलं." पोलिसांनी विचारले, "झोपडीत कोण आहे ? आणि तू बाहेर का बसला आहेस ?"

शेतकरी म्हणाला, " असं म्हंता व्हय ? आत झोपडीत हाय माजी भण आणि नवरा. "

" मग तू कोण ?" असे पोलिसांनी विचारले; तेव्हा तो म्हणाला, " मी हाय लांब तिकडचा पावणा. भणीला भेटायला आलो होतो रात झाली म्हणून मुक्काम केला. सकाळच्याला फटफटलं म्हंजे जाईन गावाकडं." त्याच्या सांगण्यावर पोलिसांचा काही विश्वास बसला नाही. त्यांनी त्या शेतकऱ्याला झोपडीचे

दार उघडायला लावले. मिणमिणत्या चिमणीच्या प्रकाशात त्या शेतकऱ्याची बहीण आणि ' मेहुणे ' गळ्यापर्यंत वाकळ पांघरून झोपले होते ! पोलीस झोपडीतून बाहेर आले. नाना पाटील इथे जवळच कोठे तरी असला पाहिजे, फार लांब जाणार नाही असे बडबडत त्यांच्या पाठलागावर झपाट्याने निघून गले ! पहाटे नाना पाटील उठले. त्यांनी त्या शेतकऱ्याच्या पत्नीला वाकून नमस्कार केला. शेतकऱ्याचा भरल्या अंतःकरणाने कृतज्ञतापूर्वक निरोप घेतला आणि अंधारातच ते चालू लागले.

आणखी एकदा तर फारच मजेशीर घटना झाली. नाना पाटील आणि त्यांचे चार पाच सहकारी मजलांवर मजला मारीत पायीच लांबच्या पल्ल्यावर निघाले होते. रात्री त्यांनी एका खेड्याच्या धर्मशाळेत मुक्काम केला. गाव संस्थान आणि ब्रिटिश हद्दीच्या सरहद्दीवर होते. भागात कानडी भाषेचा प्रभाव होता. दरोडे-खोरांनी त्या भागात उच्छाद मांडला होता. गावकरी त्रस्त झाले होते व अतिसावधपणाने वागत होते. नाना पाटील आतल्या पडवीत होते. विश्रांती घेत होते. त्यांच्या कंबरेला पिस्तुल होते. बाहेरच्या बाजूला त्यांचे सहकारी बसले होते. हळू आवाजात ते आपापसात बोलत होते. गावकऱ्यांना संशय आला व एकेक करीत बरेच गावकरी धर्मशाळेत गोळा झाले. त्यांनी त्या लोकांना छेडायला सुरूवात केली. आम्ही लांब तिकडचे आहोत. आपल्या मालकांना काही दुखणे आहे म्हणून या भागातल्या देवाचा नवस फेडायला चाललो आहोत अशी बतावणी त्यांनी चालविली होती. लोकांना ते काही खरे वाटत नव्हते. इतक्यात नाना पाटील आतल्या खोलीतून बाहेर आले. कराकरा अंग खाजवीत वैतागल्याचा अभिनय करून म्हणाले,

"तरी मी तुम्हाला सांगत होतो मला इतक्या लांब आणू नका, कसली देवी आन् कसला नवस. इथं खाज सुटून माझ्या अंगाची आग व्हाया लागलीया आन् तुम्ही लेको नवस फेडताय" असे म्हणून ते बघता बघता घुमू लागले, डोलू लागले. ते पाहून गाव-कऱ्यांनाही वाटले, ते दरोडेखोर नसावेत, खरोखरीच देवीचा नवस फेडायला चालले असावेत. तोपर्यंत तो गोंधळ गावच्या पाटलाच्या कानावर गेला होता. काय गडबड आहे ते पहायला तो धर्मशाळेत आला. लांबूनच त्याने नाना पाटलांना ओळखले. गावकऱ्यांना त्याने चांगली तराटणी दिली. ते कोण आहेत ते त्यांना सांगितले. लोक घरोघरी निघून गेले. पाटील नाना पाटलांना त्यांच्या सहकाऱ्यांसह वाडयावर घेऊन गेले. त्याने त्यांचा पाहुणचार केला व दुसरे दिवशी सकाळी बंदोबस्ताने त्यांची रवानगी केली.

महाराष्ट्रांतील ऑगस्ट आंदोलनाचे एक अग्रगण्य नेते पुण्याचे शिरूभाऊ लिमये वेश पालटून आणि नाव बदलून वावरत होते. 'दादासाहेब मराठे' हे सुटसुटीत नाव त्यांनी धारण केले होते शिरूभाऊ हरहुन्नरी आणि जगमित्र. पुण्याच्या पूर्व भागात आणि पश्चिम भागात त्यांच्या असंख्य ओळखी. त्यांनी एखाद्या वाड्याच्या दारावर थाप मारली तर त्या वाड्यातल्या अनेक बिऱ्हाडांपैकी एक दोन बिऱ्हाडात तरी त्यांची हमखास ओळख निघे. त्यांचे स्वागत अगदी मनापासून होत असे. त्यांच्या ओळखीही समाजातल्या सर्व थरात होत्या. मंडईतल्या हमालांच्या मधे जेवढ्या सहजतेने ते मिसळत तेवढ्याच सहजतेने ते डेक्कन जिमखान्यावरच्या वरिष्ठ मध्यम वर्गीयांच्या बंगल्यातही वावरत. पोलिसांचा ससेमिरा चुकविण्यासाठी एक रात्र त्यांनी फुले मंडईच्या

आवारात पोत्याच्या पटकुरांवर झोपलेल्या हमालांमध्ये अंगावर हमालाचा वेश चढवून व्यतीत केली होती.

या "दादासाहेब मराठ्यां" चा वेश आणि पोशाख वगैरे गरजेनुसार बदलत असे. त्यांच्या मागे पोलिसांच्या गुप्त हेरांचा कायमचा ससेमिरा होता. ते पोलीसही अखेरीस माणूसच होते. या देशाचेच ते नागरीक होते. बिचारे पोटासाठी सरकारी नोकरीत शिरले होते. स्वातंत्र्यासाठी लढण्याचा वसा घेतलेल्या कार्यकर्त्यांविषयी त्यांच्या मनात आदर होता. एखादा भूमिगत कार्यकर्ता अवचित नजरेला पडला तर आपण जणू काही त्याला पाहिलेच नाही, पाहिले तरी ओळखले नाही असे भासवीत तोंड बाजूला वळवून ते चालू लागत. भूमिगतांनी घातपाती कृत्यांचा झपाटा चालू करीपर्यंत पोलिसांचे वर्तन काही प्रमाणात असे बोटचेपे होते.

एकदा शिरूभाऊ लिमये असेच डेक्कन जिमखान्यावरून गावात जात होते. लकडीपूल पार करून त्यांचा टांगा नारायण पेठेच्या रस्त्याला लागला होता. वेळ होती सकाळी दहा साडे दहाच्या सुमाराची. "दादासाहेब मराठ्यां"चा वेश मोठा नमुनेदार होता. डोक्याला वैंगणी रंगाचा जरीकाठी रूमाल, तालुक्याच्या गावातल्या हायस्कूलचे हेड मास्तर जसा टापटिपीने बांधीत, तसा बांधला होता. बंद गळ्याचा गुडघ्याच्या खालपर्यंत पोहोचणारा गडद तपकिरी रंगाचा वूलन कोट अंगात घातला होता. लफ्फेदार जरीकाठी उपरणे एका बाजूच्या काखेखालून वर येऊन दुसऱ्या बाजूच्या खांद्यावर रुळत होते. स्वच्छ धुतलेले धोतर ते नेसले होते. डोळ्यावर सोनेरी काड्यांची चाळशी होती. चाळशीच्या काचा अर्थातच बिन नंबराच्या होत्या. चष्मा नाकावर थोडासा घसरलेल्या अवस्थेत ठेवून स्वारी चेहऱ्यावर बावळटपणाचा भाव

आणून टांग्यात बसली होती. खडखड करीत टांगा चालला होता. नारायण पेठेच्या वळणावर टांगा वळला. आणि शेजारी असलेल्या पोलीस चौकीतून साध्या वेशातले तीन चार पोलीस बाहेर आले. त्यांच्या पैकी एकाने चौकस नजरेने टांग्याकडे पाहिले आणि तो चमकला. मागे वळून त्याने एकदा पोलीस चौकीकडे नजर टाकली. "भाऊसाहेब" आतल्या टेबलाशी खुर्चीवर बसून मान खाली घालून काही तरी लिहीत होते. त्याने टांग्याकडे पुन्हा पाहिले. दुडक्या चालीने टांगा चालला होता. तो पोलीस किंचित हसला. टांग्याच्या दिशेने त्याने हात वर केला आणि मान फिरवून उलट दिशेने तो चालू लागला. वेषांतर केलेल्या शिरूभाऊंना त्याने ओळखले होते !

एस. एम. जोशी 'इमामअल्ली नूरभाई' या नावाने मुंबईत मुक्काम ठोकून होते. त्यांच्याकडे पुण्यापासून वरच्या सहा जिल्ह्यातल्या आंदोलनाची जबाबदारी सोपविण्यात आली होती. ते काम मुंबईत राहून करणे अधिक सोईचे होते. शिवाय मध्यवर्ती नियंत्रण मंडळाचे कार्यालय आणि वास्तव्यही बहुतांशी मुंबईतच होते. "इमामअल्ली नूरभाई" हे लीगी-मुसलमान म्हणजे मुस्लीम लीगचे कट्टे पुरस्कर्ते होते ! घारे-गोरे आणि लुकडी देहयष्टी असलेले एस. एम. मुसलमानी वेषात छान शोभून दिसत. इमाम साहेबांना शोभेशी दाढी त्यांनी राखली होती. वेशभूषा मुंबईच्या भेंडी बाजारातल्या मुसलमानाला-बोहरी-मुसलमानाला पाहून त्यांनी ठरविली असावी. अंडीवाले पेहनतात तसा आखूड पांढरा चोळणेवजा पायजामा, शेरवानी आणि मस्तकावर मुसलमानी पद्धतीचे शिरस्त्राण. सोंग छानच सजले होते. एस. एम. चे उर्दू भाषेवर प्रभुत्व आहे. उर्दूतून ते बोलू लागले म्हणजे हा माणूस मुसलमान

नाही असे मुल्ला-मौलवींची म्हणण्याची सुद्धा छाती होत नसे. हे "इमामअल्ली" ट्राममधून आणि बसमधून खुशाल हिंडत. प्रवासात एखादा राष्ट्रीय वृत्तीचा मुसलमान शेजारी बसलेला आढळला तर मुस्लीम लीगचा कैवार घेऊन त्याच्या बरोबर तंडतही. महंमद अल्ली जीनांची भूमिका किती रास्त आहे हे हिरीरीने त्याच्या गळी उतरविण्याचा अट्टाहास करीत. मुंबईत त्यांचा अगदी मुक्त संचार होता. सुरवातीच्या काळात या 'इमामअल्ली नूरभाई'चे फोर्ट भागात कोल्हापूर लेदर वर्क्स नावाचे चामड्यांच्या वस्तूंचा घाऊक व्यापार करणारे दुकान होते ! मुंबईचे एस. एम. चे एक मित्र श्री. चिकेरूर यांनी ते थाटून व सजवून दिले होते. ते बहुधा त्याच व्यवसायात होते. फोर्ट भागात त्यांची मोठी पत होती. दुकानाच्या दर्शनी भागात, सूटकेसेस्, बॅगा, चामड्याच्या वस्तू यांचा साठा होता. इमाम साहेब बाहेर बसत. आतल्या बाजूला चळवळीचे कार्यालय होते. त्या आतल्या खोलीत बसून एस. एम. भूमिगत कार्यकर्त्यांच्या गाठी भेटी घेऊन चर्चा-सल्ला मसलत करीत.

भेंडी बाजारात इमामसाहेब एकदा असेच बसमध्ये चढले. बस-मध्ये फारशी गर्दी नव्हती. वरच्या मजल्यावर ते गेले. पहातात तो एका बाकावर सुप्रसिद्ध साहित्यिक मामा वरेरकर बसलेले. एस. एम. नी हळू आवाजात त्यांच्या बरोबर उर्दूमधून बोलण्याचा प्रयत्न केला. मराठी साहित्य संमेलन जवळ आले होते. संमेलनात चले जाव आंदोलनाला पाठिंबा देणारा ठराव मांडावा असा प्रयत्न काही जण करीत होते. तो विषय काढून मामांची गंमत करावी असे एस. एम. च्या मनात आले. एक मुसलमान, तोही मराठी साहित्य संमेलनासंबंधी काही तरी बोलतो आहे, ते पाहून वरेरकर अस्वस्थ झाले. त्यांच्या तोंडातून हां, हं, या खेरीज दुसरा शब्द

काही बाहेर पडेना. एस. एम. स्वत:शीच हसले. त्यांचे उतरण्याचे ठिकाण जवळ येऊ लागले तेव्हा ते उठले. उठता उठता हळूच मामांच्या कानाला लागले आणि पुटपुटले, "मी एस.एम.जोशी !". त्यांचे ते शब्द ऐकून मामा वरेरकर बसल्या जागीच ताडकन उडाले इमामसाहेब तोपर्यंत बसचा जिना उतरून खालच्या मजल्यावर पोहोचले होते! शांतपणे खाली उतरून ते निघून गेले.

मुंबईतील भेंडी बाजारात एका मुस्लीम कुटुंबात एसेम रहात होते. त्यावेळी त्यांची इतरांना भेटायची जागा अन्यत्र होती. पण एक दिवस एका तरुण पोरीनं एसेम् राहात होते, तिथंच त्यांना गाठलं. एक हिंदू पोरगी या मुसलमान तरुणाशी गुप्तपणानं बोलतेय ही गोष्ट शंका घेण्यास पुरेशी होती.

मुस्लीम मित्रांत कुजबूज सुरू झाली. काय लफडं जमवलंय या इमामसाहेबानं ! सारा घोटाळा. शेवटी ज्या मुस्लीम मित्राला इमामसाहेबांचं रहस्य माहीत होतं त्यानं दुसऱ्या दोघांना सांगून संशय दूर केला.

पण त्यामुळं आणखी गोंधळात गोंधळ झाला. तो काळ रोजाचा होता. आपला असलीपणा दाखविण्यासाठी एसेम रोजा पाळत होते. पण रहस्य स्फोट झाल्यानंतर मग मुसलमान मित्र म्हणाले, 'अरे इमामसाब ! अब खोलिए रोजे ! यूं कि अब आपका राज भी खुल गया है !'

इमामसाहेब खूपच रुबाबदार व आकर्षक दिसत होते. एकदा काय झालं, बसमधून ते कुठं तरी निघाले होते. ज्या बाकावर ते बसले होते तिथंही शेजारची जागा रिकामी होती. समोरच्या बाकावरही एका माणसा शेजारी एक जागा रिकामी होती. बाकी

सर्व बस पूर्ण भरली होती. थांब्यावर बस थांबल्यानंतर एक मुस्लीम जोडपं आत शिरलं. एसेमना उत्सुकता वाटली की हा माणूस आपल्या बायकोला कुठं बसवणार? आश्चर्य असं की आपल्या जातभाईजवळ ( म्हणजे इमामसाहेबाजवळ ) बायकोला त्यानं बसू दिलं नाही. स्वतः बायकोसमोर बसला व बायको समोरच्या माणसा जवळ बसली. म्हणजे एसेम किती छकडे दिसत असतील नाही ?

साने गुरुजी भूमिगत असताना आपल्या नेहमीच्या वेशाचा सहसा त्याग करीत नसत. गुरुजींच्या भेटीसाठी मुंबईच्या भूमिगत मूषक महालात सारेच लहान थोर कार्यकर्ते येत. कोणाला त्यांना कामाचा अहवाल द्यावयाचा असे, तर कोणाला पुढच्या कामाच्या सूचना द्यावयाच्या असत. काही जण निराश झालेले असत. त्यांना साने गुरुजींना भेटून त्यांच्याकडून उत्साहाची शिदोरी भरून घ्यावयाची असे. ज्याला जे हवे असेल ते गुरुजी मुक्त हस्ताने देत आणि मूषक महालात वस्तीला असलेल्या कार्यकर्त्यांना रुचकर जेवण करूनही वाढीत असत. गुरुजींची माया म्हणजे आईची माया होती. त्यांच्या हातून शिजलेल्या अन्नाला आईच्या मायेचा स्पर्श होता आणि त्यांच्या हाताचा स्पर्शही आईच्या हाताच्या स्पर्शासारखा शामक, आश्वासक होता. तरुण भूमिगत कार्यकर्त्यांना, तो हात पाठीवर फिरला म्हणजे कसे अगदी भरून येत असे. तेथेच बसून गुरुजी गुप्त बुलेटिन्स लिहीत. बुटके डेस्क पुढे ओढून खुरमांडी घालून ते बसले म्हणजे शब्दांचे निखारे पुढच्यातल्या कागदावर धगधगू लागत. आपण सारे जण कागदावर पांढऱ्यावर काळे करतो तेव्हा कागदावर शब्द उमटतात. तोंड उघडून बोलतो तेव्हाही तोंडातून

शब्दच बाहेर पडतात. परंतु साने गुरुजी बुलेटिन्स तयार करीत, गुप्त नभोवाणी केंद्रासाठी प्रचार साहित्य तयार करीत तेव्हा त्यांच्या लेखणीतून लाव्हा रस बाहेर पडत असे. बोलत तेव्हा मुखातून तप्त लोखंडाचा रस उफाळून बाहेर पडतोय असे वाटे. कृष्णाने मोहमायेने गलितगात्र झालेल्या अर्जुनाला कुरूक्षेत्रावर गीता सांगून त्याचा पुरुषार्थ जागा केला. तेवढ्याच तोलामालाचे कार्य साने गुरुजींनी ऑगस्ट आंदोलनात भूमिगत राहून केले. शेकडो तरुणांना त्यांनी स्फूर्ती दिली. हजारोंना कार्यप्रवण केले. मातीच्या ओबड धोबड पुतळ्यांमधून कार्यकर्ते निर्माण केले. गुरुजींच्या विचारांचा स्पर्श होण्यापूर्वी ते कार्यकर्ते चारचौघां-सारखेच मातीचे जिवंत असलेले पण मेलेल्या मनाचे पुतळे होते. त्या पुतळ्यांमधून सानेगुरुजींनी कार्यकर्ते बनविले.

कर्जत तालुक्यातील भाई कोतवाल यांचे सहाय्यक द्वारका-नाथजी हरकारे उर्फ काकाजी यांनी मुंबईला जुन्या हनुमान गल्लीतल्या पारेख बिल्डींगमध्ये ग्रामोद्योग भोजनालय चालवले होते. भूमिगत नेत्या-कार्यकर्त्यांचा तो अड्डा होता. अजूनपर्यंत तो पोलिसांच्या डोळ्यावर आला नव्हता. त्याच इमारतीत डॉ. लकडावाला यांचा दवाखाना व स्टोअर रुम होती. डॉक्टर लकडावाला भूमिगतांचे सहाय्यक व मित्र होते.

डॉ. लोहिया हे कैकदा काकाजींना भेटावयास येत. एकदा दोघं असेच बोलत असता भूमिगतांच्या हेराने बातमी दिली, बाहेर चौकीत पोलिस आले आहेत व त्यांचा रोख इथे भोजनालयात येण्याचाच दिसतो ! आता काय करणार ?

काकाजी लोहियांना म्हणाले, "हे स्वागत खास तुमच्यासाठीच दिसतंय !"

लोहियांनी विचारले, 'आता काय करावं ? सध्या पकडून घेऊन चालणार नाही ! '

क्षणमात्र विचार करून काकाजी म्हणाले, "हं ! आता उठा. तुमचा पोषाख उतरवा व आमच्या रामा गड्याचा पोषाख चढवा. आणि चटकन जाऊन भांडी घासायला बसा."

लोहिया भांडी घासत असतानाच खाड् खाड् बुटांचे आवाज करीत पोलिसांची टोळी भोजनालयात घुसली. जेवणाची खोली, स्वयंपाक घर, कोठी घर, नहाणी घर, संडास सर्व तपासून झाले. डॉ. लकडावालांच्या दवाखान्यात जायला भोजनालयातून रस्ता आहे का ते पोलिस शोधत होते. पोलिसांना खात्री होती, लोहिया नक्की इथेच आहेत. इमारतीचे वरचे मजलेही पाहून झाले. पण पोलिसांचा वरचा मजला रिकामा असल्याने लोहिया कसे सापडणार ?

लोहियांचे सोंग बेमालूम वठले होते. त्यांना तो आत्मविश्वास आल्यावर मग पोलिसांच्या समोरून हा रामा गडी ताटे उचलून नेत होता, वाढत काय होता, टेबल काय साफ करत होता, ताट घासून पुसून काय ठेवत होता !

विचारूचं नका ! मध्ये मध्ये काकाजी रामावर खेकसत होते. पण पोलिस झाडाझडती घेऊन खानावळीतून बाहेर पडले मात्र,

काकाजींचा अवतार एकदम बदलला. साबण, टॉवेल लोहियांच्या हाती देऊन त्यांनी लोहियांना बाथरूममध्ये ढकलले.

"काकाजी, तुमच्या प्रसंगावधानानं आज बचावलो!" काकाजींच्या पाठीवर थाप मारून निरोप घेताना लोहिया म्हणाले.

मार्ग सुरक्षित आहे असे भूमिगत हेराने सांगितले आणि लोहिया बाहेर पडले.

राजाभाऊ कुलकर्णी

☆ ☆

म. ग्रं. सं.
क्र. २०७८ ११।१।८७
विषय चां.वा. क्र.
BVBK-0402078

स्वातंत्र्य-कथा



## जेल फरार

१९४२ चा "छोडो भारत" उठाव म्हणजे अनेक अद्‌भुत साहस-कथांची प्रदीर्घ मालिका.

गांधीजींचा संदेश होता "तुम्ही स्वतंत्र आहात असे समजून वागा. तुरुंगात जाऊन बसण्याचे तंत्र आता जुने व निःसत्व झाले आहे."

न्यायालयात किंवा तुरुंगात नेत असतांना देशभर शेकडो ठिकाणी जनतेने बंदोबस्तासाठी असणाऱ्या पोलीसांवर हल्ले चढवून आंदोलकांना सोडविले तर अनेक तुरुंगांवर आक्रमणें करून आपल्या नेत्यांना मुक्त केले.

तर अनेकानेक क्रांतिकारक जेलच्या उंच भिंती चढून जेलमधून फरारी होण्यात यशस्वी झाले. अशा कांही जेल फरारांच्या या अपूर्व साहस-कथा.

**किंमत ८ रु.**

छपाई के. जोशी ॲण्ड को. पुणे ४११ ०३०.